बुधवार, १९ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२२५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 19 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-225 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला फटकारले

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली : बिल्किस बानो सामुहिक बलात्कार प्रकरणातील गुन्हेगारांची गेल्या वर्षी पॅरोलवर मुक्तता करण्यात आली. गुजरात सरकारने घेतलेल्या या निर्णयाचे पडसात देशभर उमटल्याचे पाहायला मिळाले. बिल्किस बानो सामुहिक बलात्कार प्रकरणातील एकूण ११ गुन्हेगारांना शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, गुजरात सरकारने ही शिक्षा पूर्ण होण्याआधीच या गुन्हेगारांना १५ ऑगस्ट २०२२ रोजी पॅरोलवर सोडले. गुजरात सरकारच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या सुनावणीवेळी न्यायालयाने गुजरात सरकारला फैलावर घेतले.**

बिल्किस बानो यांनी गुजरात सरकारच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. शिक्षा पूर्ण होण्याआधीच गुन्हेगारांची मुक्तता करण्यात आल्यामुळे समाजाच्या मूलभूत मानवी तत्वांनाच धक्का बसला आहे, असे बिल्किस बानो यांनी याचिकेत म्हटले होते. २७ मार्च रोजी त्यांनी ही याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती के. एम. जोसेफ आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी चालू आहे. यावेळी न्यायालयाने गुजरात सरकारला परखड शब्दांत सुनावले.

न्यायालयाने यावेळी गुजरात सरकारला सुनावताना महत्त्वाच्या मुद्द्यांवर टिप्पणी केली. राज्य सरकारने या गुन्हेगारांची पॅरोलवर मुक्तता करताना संबंधित गुन्ह्याची



तीव्रता लक्षात घेणे गरजेचे होते, असे न्यायालयाने नमूद केले. फक्त केंद्र सरकारने राज्य सरकारच्या निर्णयाला मान्यता दिली याचा अर्थ राज्य सरकारने या प्रकरणात स्वतः विचारच करायचा नाही असा होत नाही, असेही न्यायालयाने यावेळी म्हटले. इथे प्रश्न हा आहे की राज्य सरकारने यावर काही विचार केला की नाही ? हा निर्णय राज्य सरकारने कोणत्या पुराव्यांच्या आधारे घेतला ? न्यायालयाने त्यांना दोषी ठरवून शिक्षा सुनावली तेव्हा त्यात हे गुन्हेगार पुढील आयुष्यभर तुरुंगात राहाणे अपेक्षित होते. पण त्यांना सरकारच्या आदेशांनी सोडून देण्यात आले. आज या महिलेच्या ( बिल्किस बानो ) बाबतीत हे घडते. उद्या तुम्ही किंवा मीही तिच्या जाही असू शकतो. त्यामुळे यासंदर्भात निर्णय घेताना निश्चित अशी नियमावली असायला हवी. जर तुम्ही आम्हाला याचं कारण दिले नाहीत, तर आम्ही आमच्या पद्धतीने यावर निष्कर्ष काढू, अशा शब्दांत न्यायालयाने गुजरात सरकारला ठणकावले आहे.




# गोदापात्रातून अवैधरित्या वाळूचे उत्खनन

## 18 वाळू चोरांच्या संपत्तीवर 4 कोटी नव्वद लाख रकमेचा सामूहिक बोजा

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** तालुक्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू चोरांवर महसूल विभागाची करडी नजर असून गेल्या महिनाभरात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणात कारवाया करण्यात आल्या आहेत. साष्टपिंपळगाव येथे दि. 24 मार्च रोजी 18 वाळूचोरांकडून गोदावरी नदी पात्रातून केनीच्या सहाय्याने 20 फुट खोल खोदून 2 हजार ब्रास वाळूची चोरी करण्यात आली होती. मात्र महसूल पथक आल्याची माहिती लोकेशन घेणाऱ्या व्यक्तींनी वाळू चोराना दिल्याने ते पळून गेले. मात्र ज्या शेतातून हा गोरखधंदा चालायचा त्या शेतीसह त्या 18 वाळू चोरांच्या मालमत्तेवर 4 कोटी नव्वद लाख 72 हजार इतक्या रकमेचा सामूहिक बोजा टाकण्यात आला आहे. याविषयी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिलेली माहिती अशी की,जिल्हाधिकारी विजय राठोड, अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके तसेच उपविभागीय अधिकारी भाऊसाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 24 मार्च रोजी मौजे साष्टपिंपळगाव येथे तहसील कार्यालयाच्या पथकाने भेट दिली. गोदावरी नदीपात्रातून 20 फूट खोल पाण्यातून केनीच्या सहाय्याने अवैधरित्या वाळूचे उत्खनन करणारे व महसूल पथकाचे लोकेशन बघणारे व्यक्ती पळून गेले. जवळपास 18 लोकांनी संगनमताने गोदावरी नदीपात्रातून वाळूचे अवैधरित्या 15 ते 20 दिवसापासून गोदावरी नदीपात्रातून अंदाजे 2 हजार ब्रास वाळूचे उत्खनन केले असल्यास्थानिक पंचांनी महसूल विभागाच्या पथकाला सांगितले. तसेच सदर वाळूचे उत्खनन करण्यासाठी मधुकर सखाराम खराद यांनी गट न. 399 मधून शेतातून रस्ता उपलब्ध करुन दिला. त्यामुळे या शेतमालकासह 18 लोकांच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर 4 कोटी नव्वद लाख 72 हजार इतक्या रकमेचा सामूहिक बोजा टाकण्यात आला असल्याची माहिती तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिली.



गौण खनिजाची चोरटी वाहतूक अथवा खोदकाम कोणी करत असेल किंवा चोरट्या वाहतुकीसाठी मदत करत असेल तर त्यांची नावे संबंधित मंडळ अधिकारी, संबंधित तलाठी, पोलीस पाटील संबंधित पोलीस स्टेशनला तात्काळ . – चंद्रकांत शेळके, तहसीलदार अंबड

### पंचांनी सांगितल्याप्रमाणे बोजा टाकण्यात आलेल्यांची नावे पुढीलप्रमाणे....

1.दत्ता मधुकर खराद रा.साष्टपिंपळगाव
2.प्रदीप धोत्रे रा.शहागड
3.लखन परदेशी रा.शहागड
4.विलास खेडकर रा. अंकुशनगर
5.शुभम चावरे रा.पाचोड
6.विजय मरकड रा. गोंदी
7.नारायण खराद रा.डोमलगाव
8.माऊली खराद रा. गोंदी
9.गणेश उद्धव खराद
10.नाथाजी भास्कर खराद
11.संजय नानासाहेब कटारे ( शेत मालक कटारे पॉईंट )
12.विकास खराद रा.गोंदी
13.दुर्गादास वाटोरे रा.गोंदी
14.मनोज खराद रा. गोंदी
15.अमर खराद रा.डोमलगाव
16.नामदेव गुलजकर रा.डोमलगाव
17.अमोल पंडित रा. अंकुशनगर
18.कृष्णा एकनाथ गुलजकर रा.डोमलगाव ता.अंबड

# शेतकऱ्यांना मदतीची आस; अवकाळीने केला भ्रमनिरास !

## गारपीट होऊन बरेच दिवस झाले तरी अजून पंचनामे नाहीत; शेतकरी हवालदिल


आधुनिक केसरी न्यूज

**हणमंत सगरे**

**निलंगा :** लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील अनेक गावांना अवकाळी पावसाचा फटका बसला असून, यामुळे हातातोंडाशी आलेला शेतकऱ्यांचा घास हिरावला गेला आहे. अवकाळी पावसाने अक्षरशः भ्रमनिरास केला असून, शेतकऱ्यांना मदतीची आस लागली आहे. मात्र, अद्यापही पंचनामे झाले नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. निलंगा तालुक्यातील काही भागातील मागील काही दिवसापूर्वी गारपीट झाली आहे. गारपीट मुळे ज्वारी, करडी असे अनेक पिकाचे नुकसान झाले आहे. शासनाच्या आदेशाने पंचनामे करण्यासाठी तलाठी निबालकर मनोज हे चनाचीवाडी या गावामधे आले होते, पण पंचनामे न करता सरसकट नुकसान भरपाई देण्यात येणार आहे असे सागितले होते. परंतु, तलाठी यांनी शेतीमध्ये न जाता गावामधील जवळच्या मित्राच्या घरी बसून मित्राच्या सागण्यावर गावातील काही जवळील लोकांचे नावे घेतली आहे व नोद करून घेतली आहे एवढेच नाही तर



तलाठी यांनी ज्या शेतकऱ्यांनी जवारीच पेरली नाही त्या शेतकऱ्याची ज्वारी पेरली अशी नोंद घेण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी ज्वारी पेरली आहे त्याची नोंद घेतली नाही असे बरेच शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहणार आहेत असे दिसून येत आहे. ज्या शेतकऱ्याची नोंदच घेतली नाही किंवा प्रत्यक्ष पाहणी केलीच नाही, असे शेतकरी अंकुश सगरे, अनिल धोंडीराम सगरे, नागनाथ विठ्ठल सगरे, अंबादास मोहन कदम, संभाजी मोहन कदम, वसंत भोसले, दत्तात्रय सगरे, प्रल्हाद भाऊसाहेब पाटील, इंद्रजीत साधू सगरे असे अनेक शेतकरी आहेत. तरी या शेतकऱ्यांचे तहसीलदार साहेबांनी स्वतः लक्ष घालून फेर पंचनामे करावे अशी शेतकऱ्याची मागणी आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

# रामका गुणगान करिये

आश्रमातील सगळी कामे करतो, नियम पाळतो. इतर विद्यार्थी जे काही अन्न ग्रहण करतील तेच अन्न तोही ग्रहण करतो. कुठेही राजपुत्र असल्याचा तोरा तो मिरवत नाही. आश्रमातील शिक्षण पूर्ण झाल्यावर निघताना वसिष्ठ ऋषींचा आणि गुरुमातेचा आशीर्वाद घेऊन तो निघतो. त्यावेळी गुरुमातेला तो म्हणतो, ' या आश्रमात तुम्ही आम्हाला मातेचे प्रेम दिले. मातेची आठवण येऊ दिली नाही. आमची पुत्रवत काळजी घेतली. या आश्रमातील वास्तव्यात माझ्याकडून जर काही चुकलं असेल तर, आपण उदार मनाने मला क्षमा करावी. ' केवढा हा नम्रपणा !

आश्रमातील शिक्षण पूर्ण करून राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न आपल्या गृही परततात. आता खरे तर काही दिवस त्यांचे मौजमजेचे आणि विश्रांतीचे. पण अशातच विश्वामित्र ऋषी येतात. त्यांच्या यज्ञात राक्षस विघ्न आणतात म्हणून संरक्षणासाठी रामाला आपल्याबरोबर पाठवण्याची मागणी करतात. वसिष्ठ ऋषींच्या समजावण्यानंतर दशरथ राजा रामाला विश्वामित्रांसोबत पाठवतो. अशा वेळी राम आनंदाने त्यांच्याबरोबर जातो. सोबत लक्ष्मणही असतोच ! लक्ष्मण हा रामाची सावली आहे. सावली जशी आपली साथ सोडत नाही, तशीच लक्ष्मणही रामाची साथ कधीच सोडत नाही. विश्वामित्रांसोबत वनातून जात असताना राम आपल्या मधुर वाणीने आणि आज्ञाधारकतेने विश्वामित्रांचे मनही जिंकून घेतो. त्यांना म्हणतो, ' कदाचित माझ्या शिक्षणात काही अपूर्णता राहून गेली असावी. मला तुमच्याकडून काही नवीन शिकायला मिळावे म्हणूनच ही नियतीची योजना असावी. ' विश्वामित्र आपल्या या गोड आणि तेजस्वी शिष्यावर बेहद्द खुश होतात आणि राम लक्ष्मणाला काही दिव्य अस्त्रं बहाल करतात, जी त्यांना पुढील काळात उपयोगी पडतात. मग मला आठवतो तो राम की ज्याला राज्याभिषेक होणार असतो.





## आनंदी पहाट

# प्रत्येक क्षण हा आयुष्यातील परीक्षेचा नवा विषय

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सद्यःस्थितीतील आपली जीवनशैली, दिनचर्या, व्यावसायिक व्यवधानं आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या ह्या सर्व बाबींमुळे अनेकदा आपण स्वतःसाठी सुद्धा पुरेसा वेळ देऊ शकत नाही. अनेक गोष्टींचा थोडा हटके विचार करू शकत नाही अथवा तसा तो करायचा विचारही मनांत येत नाही. एका विशिष्ठ वैचारिक बैठकीच्या चौकटीत राहून मानसिकदृष्ट्या सुखद वातावरणाची आपल्याला सवय झालेली असते. ती चौकट भेदून काही वेगळा विचार करता येऊ शकतो, त्याचा निराळा अनुभव येऊ शकतो हेच आपण लक्षांत घेऊ शकत नाही. आपल्या आयुष्यातले अनेक

निर्णय इतरांच्या विचारांनी घेतले जातात किबहुना त्यांच्या मतांवर ठरत असतात. आपल्या स्वतःसाठी अगदी आपल्याच अंतर्मनांत वैचारिक मंथन आपण का घडवून आणत नाही ? प्रत्येक विचाराची सुरुवात सकारात्मकतेनं होणं जरुरीचं, आवश्यक असल्याचं समजून घेतलं पाहिजे. आपल्या प्रत्येकाच्या जीवनात खरी परीक्षा आपल्या धीराची, सचोटीची, मेहनतीची, हुशारीची, बौद्धिक कौशल्याची असते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपण नवीन परीक्षाच देत असतो. अनेकदा ही परीक्षा देताना प्रत्येकाला परीक्षार्थी होणं पसंत नसतं किंबहुना परीक्षकाची भूमिका वठवली जावी असं वाटत असतं. संवादाआभावी अनेक गैरसमज, मतभेद, वादविवाद सुरु होतात. स्वतःपेक्षा दुसऱ्यांकडून, इतरांकडून अवास्तव अपेक्षा केल्या जाऊ लागल्या कि, परस्परांमध्ये तणावाचं वातावरण निर्माण होऊ लागतं. कुटुंबामध्ये संवाद, सहवास, सहकार, सहभाग, समानता ह्या बाबी टिकवून ठेवणं जरुरीचं असतं. त्यायोगे मिळणारं सुख, समाधान, शांती हे सर्व अधिक आवश्यक, महत्वाचं आणि म्हणूनच गरजेचं असतं. ह्यासाठी कुटुंबातील प्रत्येकानं परस्परांच्या संदर्भातील विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवरच केला पाहिजे. हे का आणि कसं असावं, ते समजून घ्यायला आणि अंगीकारायला हवं.



आधुनिक केसरी

**उध्दरी सकळ | रामकृष्ण ||**
**संथ त्या प्रवाही | नसे खळखळ ||**
**रहावे नितळ | अंतरबाह्य ||२||**
**स्थितप्रज्ञ अंगी | असे ज्याचे बळ ||**
**ब्रह्मानंदी मेळ | त्याचे ठायी ||२||**
**समाधान चित्ती | वसे सर्वकाळ ||**
**उगा उतावीळ | काय कामी ? ||३||**
**ज्याचे त्याचे कर्म | देते त्यास फळ ||**
**ध्यानी ठेव वेळ | हाती नाही ||४||**
**सत्कर्माचे ठायी | सुखाचा सुकाळ ||**
**उध्दरी सकळ | रामकृष्ण ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**नेत्रे द्वे चापि कर्णौ द्वौ प्रकृत्या रचना परा।**
**जयो तु जायते तस्य यो विश्वसति नेत्रयोः।।**
**ही प्रकृतीची उत्तम रचना आहे की, डोळे दोन आहेत आणि कानही दोन दोन आहेत. जो डोळ्यांवर विश्वास ठेवतो; त्याचाच जय होतो. नेत्रे द्वे चापि कर्णौ द्वौ प्रकृत्या रचना परा।जयो तु जायते तस्य यो विश्वसति नेत्रयोः।।ही प्रकृतीची उत्तम रचना आहे की, डोळे दोन आहेत आणि कानही दोन दोन आहेत. जो डोळ्यांवर विश्वास ठेवतो; त्याचाच जय होतो.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**शशि दुतिया का मान है, दिन आरत गुरु जान ।**
**जन गति शोभ अधीनता, दिन साहेब सनमान**
**।।२५।।(स्वर्वेद तृतीय मण्डल दशम अध्याय)**
**०३/१०/२५**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
द्वितीयेच्या चंद्राचा मान असतो तद्वतच दीन आर्त भाक्ताचा गुरूंच्या शरणात मान असतो. अधीनता म्हणजेच नम्रतेने जीवनात शोभा प्राप्त होते. दीन सेवकच परमप्रभू स्वामींच्या शरणात सन्मान प्राप्त करतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## देवदर्शन

आधुनिक केसरी

मायेच्या आवरणाखाली वावरणा-या जीवांना संपूर्ण विश्व सत्य वाटते. मनाने अज्ञानाचा ऐवढा ताबा घेतलेला असतो की इंद्रियाच्या व्यापारावर आधारलेले जीवन खरे वाटते. अज्ञान निर्माण करून विश्वभ्रम भासवणे आणि तेच अज्ञान कमी करून विश्वरूप दाखवणे हा मुळ मायेचा खेळ आहे. याचे ऊत्तर आपल्या सारखी सामान्य माणसं देऊ शकत नाहीत. म्हणून तर मित्रांनो आपण आता"ज्ञानदशक"या दशकाचा अभ्यास करणार आहोत. हे शिव धनुष्य ऊचण्यास अवघड आहे खरे पण आपला प्रयत्न जर प्रामाणिक असेल तर श्री राम रायाचा व श्री समर्थाचा आशिर्वाद असल्याने ते शिवधनुष्य ऊचण्यास बळ देतील ताकद देतील यावर तीळमात्र शंका नाही. समर्थाच्या मते देवदर्शन म्हणजे आत्मज्ञान होय. जीवन जगत असताना येणारे अनुभव हे खुप काही सांगुन जातात. या अनुभवाच्या जोरावर त्याला अनेक गूढ,आश्चर्य कारक अनुभव येतात. खरा देव अतिंद्रिय व अद्रुष्य आहे. देव हा या पंचमहाभूतांच्या विश्वातील पदार्था सारखा नाही. ह्या जगात आपण वावरत असताना विश्वात ज्या ज्या अनाकलनीय घटना आपण पहातो त्याचे ज्ञान होणे म्हणजे खरे देवदर्शन समजावे. पण मित्रांनो आपण समाजात पहातो तर अशा अनेक भाषा,बोलणारे ,जातीपातीच्या बंधनात अडकणारे,अनेक उपास्य देवतांचे अवडंबर माजवणारे,अनेक रहस्यमय कथांमध्ये अडकुन पडणारे दशक व या संकल्पनेत स्वतः आयुष्यात हलकल्लोळ माजवतो. तिर्थाटन करा देव भेटेल. पूजाअर्चा करा,पुण्यसंचय करा,सतत दानधर्म करा. योगसाधना करा . हे सगळं केलं तरी देव काही केल्या भेटत नाही. कसा भेटेल देव?
तो काही बाजारातील वस्तू नाही. तर देव भेटण्यासाठी मनाचा साधेपणा,सच्चेपणा असेल तर तो तुमचा पत्ता विचारत विचारत तुमच्या कडे येईल. सर्व सामान्य माणसाला देवाचे दर्शन घ्यावे, तो कसा आहे ते पहावे असे वाटणे स्वाभाविक आहे देवाची गणती करता येणार नाही ऐवढे जगात आहेत. उपासनेचे अगणित प्रकार आहेत. शास्त्रांची संख्या खूपच मोठी आहे. त्या मध्ये भेदाभेद पूरेपूर आहेत. अशा हळकल्लोळात अडकलेल्या माणसाला देव शोधावा लागतो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# संत हे भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात

आधुनिक केसरी

ज्याला सत्याचे ज्ञान झाले तो सर्वज्ञच बनला; आणि जे या सत्याला धरून राहतात ते संत होत. संत आपल्याला मार्ग दाखवायला तयार असतात, परंतु आपला अभिमान आड येतो, आणि आपण संतांना नावे ठेवतो.
एकजण संतांना उद्देशून म्हणाला, तुम्ही आमचे नुकसान करता; अपकार करणाऱ्यावरही उपकार करायला सांगून आम्हांला मेषपात्र करता.
वास्तविक, आपल्या संतांनी कर्मांचा ढीग पाडला आहे, पण त्यांच्या आणि आपल्या कर्मांमध्ये फरक आहे. 'राम कर्ता' या भावनेने त्यांनी कर्म केले; आपण 'मी' पणाने करतो, म्हणून कर्म आपल्याला बंधनकारक बनते.
संतांची कामगिरी कुणाला दिसत नाही; आणि आमची फक्त दिसण्यापुरतीच असते, त्यामुळे ती पुरी पडत नाही! एखादा पुष्कळ ज्ञानी झाला, पण ते ज्ञान जर वृत्तीत उतरले नाही तर त्याचा काय उपयोग ? जगाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जो सुखदुःखाच्या जाळयात सापडला नाही त्याच्याकडे जावे. तो



साक्षित्वाने राहून जगापासून अलिप्तच राहतो. कर्म करूनही तो अलिप्त राहतो. आपण मात्र सुखदुःखात गुरफटून जातो. संताचे अंतःकरण शुद्ध असल्यामुळे त्याची शिव्यांची भाषासुद्धा न बोचणारी, किंबहुना आशीर्वाद रूपच ठरते. सत्पुरूष काही विद्वान् नसतात. अती विद्वान् मनुष्य कोणी सत्पुरूष झालेला ऐकिवात नाही. कुणी आठव्या वर्षीच घरातून निघून जातो, तर कुणी लग्नातून पळून जातो, तर कुणाला लिहायला वाचायलाही येत नाही, असे लोक सत्पुरूष झालेले आढळतात. संतांनी देह सोडल्यावर सुद्धा लोकांना त्यांचे अस्तित्व भासते. लहान मूल बाहेर खेळत असते, परंतु मध्येच त्याला आईची आठवण होऊन तिच्याकडे धावते. याचा अर्थ असा की, मुलाला आईचे सूक्ष्म स्मरण सतत असते. तसा भगवंताचा चटका, तशी त्याच्या अस्तित्वाची जाणीव, तशी त्याची निष्ठा, आपल्याजवळ पाहिजे. भगवंताची अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो. त्या स्थितीत त्याला कुणी संत भेटला की तो निवांत होतो. संत हे खरोखर आईसारखे आहेत.
ते आपल्याला भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात. सर्व जगावर संतांचे उपकार आहेत. त्यांनी परमात्म्याला सगुणात आणले आणि तो आपल्याला सुसेव्य केला; परमात्म्याला आपलासा करून घ्यायला नामस्मरण हे सोपे साधन दिले.
एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी, असे सोपे सद्ग्रंथ निर्माण केले, आणि यथाशक्ती अन्नदान करणे हेच कलियुगात उत्तम साधन आहे असे सांगितले. या चार गोष्टी आचरणात आणायचा प्रयत्न ज्याने केला, त्याला काही कमी पडणार नाही, नेहमी समाधानच राहील.
**बोधवचन :जग संतांशिवाय असणे शक्य नाही, आम्हाला त्यांना ओळखता येत नाही.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १९ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# राज्यात तापमान वाढीसह अवकाळी पावसाचा इशारा



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यातील तापमानाने एकीकडे चाळीशी पार केली असताना दुसरीकडे राज्याला अवकाळी पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्रासह विदर्भ आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाचा अंदाज खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. तर दुसरीकडे तापमानात देखील वाढ होण्याचा संकेत देण्यात आला आहे. विशेषकरुन विदर्भाला वाढत्या तापमानाचा तडाखा अधिक बसणार आहे. नागपूर वेधशाळेने वर्तवलेल्या अंदाजनुसार पुढील दोन दिवस विदर्भाच्या तापमानात वाढ होणार आहे. नागपूर शहराच्या तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला असून त्यात आणखी दोन ते तीन अंशाने वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर विदर्भात चंद्रपूर आणि ब्रम्हपूरी या दोन शहरांमध्ये सर्वाधिक तापमानासाठी चढाओढ सुरू आहे. या शहरातचे तापमान ४२-४३ अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक आहे. त्यामुळे नागरिकांनी घराच्या बाहेर पडताना काळजी घेण्याचा सल्ला नागपूर वेधशाळेने दिला आहे. दरम्यान, राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठे उन्हाचा तडाखा तर अवकाळी पाऊस पडत आहे. या अवकाळी पावसाचा शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. द्राक्ष, केळी, आंबा, संत्रा या बागांना मोठा फटका बसला असून दुसरीकडे गहू, ज्वारी, मका, हरभरा, भाजीपाला या पिकांचेही नुकसान झाले आहे. सध्या राज्यातील नागरिकांना सकाळी उन्हाळा आणि संध्याकाळी पावसाचा सामना करावा लागत आहे.

## आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच आहोत आणि राष्ट्रवादीतच राहणार आहोत...

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कारण नसताना माझ्याबद्दल किंवा माझ्या सहकारी आमदारांबद्दल गैरसमज निर्माण करण्याचे काम जाणीवपूर्वक वेगवेगळ्या ठिकाणी होताना दिसत आहे. वास्तविक ज्या काही बातम्या दाखवल्या जात आहेत किंवा येत आहेत त्या बातम्यांमध्ये काही तथ्य नाही अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत मांडली. गेले काही दिवस माध्यमातून येत असलेल्या उलटसुलट बातम्यांवर आज विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आपली भूमिका मांडत माध्यमांतील सूत्रांची हवाच काढून टाकली.

आपण सातत्याने माझ्याबद्दलच्या बातम्या पसरवत आहात त्यामध्ये यत्किंचितही तथ्य नाही. माझ्याकडे ४० आमदारांच्या सह्यांचे पत्र असल्याचे दाखवले परंतु अशा सह्या घेण्याचे कारण नाही. आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच आहोत आणि राष्ट्रवादीतच राहणार आहोत त्यामुळे या बातम्यांना कुठलाही आधार नाही असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. वेगवेगळ्या चॅनेलवर इतर राजकीय पक्षाचे नेते आपली मते व्यक्त करत आहेत त्यांनी ते काय व्यक्त करावे तो त्यांचा अधिकार आहे मात्र मंगळवार, बुधवार आमदारांच्या बैठका असतात. आमचे अनेक आमदार मंत्र्यांकडे किंवा मंत्रालयात कामाच्या निमित्ताने येत असतात. आज जे आमदार आले होते ते माझ्याकडे मी इथे आहे म्हणून भेटायला आले होते. ती नेहमीची पध्दत आहे यामध्ये वेगळा अर्थ काढू नका. त्यामुळे हे जे आमदार भेटले तुम्ही दाखवत आहात. त्याच्यातून त्यांच्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचा सर्वसामान्य कार्यकर्ता आहे जो आमच्या पक्षाचा कणा आहे तोही संभ्रमावस्थेत जातो त्या सगळ्यांना सांगायचे आहे बाबांनो, काही काळजी करू नका आदरणीय पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली, नेतृत्वाखाली पक्षाची स्थापना झालेली आहे. पक्षात अनेक चढउतार आले. राजकारणात सत्ता होती, कधी सत्ता नव्हती परंतु ज्या काही बातम्या पसरवल्या जात आहेत त्या जाणीवपूर्वक पसरवल्या जात आहेत असे आवाहनही अजित पवार यांनी यावेळी केले. आज महाराष्ट्रातील जनतेच्या पुढे महत्वाचे प्रश्न आहेत. कापूस, कांदा शेतकरी हैराण झाला आहे. मुख्यमंत्र्यांनी दौरा केला त्यांचे त्यांनी काम केले. त्यांचे ते कर्तव्य होते परंतु दौरा केल्यानंतर तातडीची मदत केली पाहिजे होती ती मदत होताना दिसली नाही. बारदाने नाहीत म्हणून खरेदी केंद्रांचे काम बंद पडले हे काय उत्तर झाले का? असा संतप्त सवाल करतानाच बारदाने गोळा करण्याचे किंवा उपलब्ध करून देण्याचे काम सरकारचे आहे. याकडे लक्ष द्यायला हवे त्याकडे लक्ष नाही असे खडेबोलही अजित पवार यांनी सरकारला सुनावले.

## दाभोलकर हत्या; न्यायालयाच्या देखरेखीची आवश्यकता नाही

### उच्च न्यायालयाकडून दाभोलकर कुटुंबीयांची मागणी अमान्य

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** अंधश्रद्धा निर्मूलन समितीने संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या तपासावर आणि खटल्यावर देखरेख कायम ठेवायची आवश्यकता नाही, असे उच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट केले. तसेच देखरेख कायम ठेवण्याची दाभोलकर कुटुंबीयांची मागणी अमान्य केली. तपासाबाबत असमाधानी असलेल्या दाभोलकर कुटुंबीयांनी प्रकरणाचा तपास आणि खटल्यावर न्यायालयाने देखरेख कायम ठेवण्याची मागणी केली होती. तर विक्रम भावे,वीरेंद्र तावडे या आरोपींनी हस्तक्षेप याचिका करून प्रकरणावर न्यायालयाने देखरेख ठेवण्याची आवश्यकता नसल्याचे म्हटले होते. या प्रकरणी निर्णय देताना न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती प्रकाश नाईक यांच्या खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखला देऊन या प्रकरणाचा तपास आणि खटल्यावर देखरेख कायम ठेवण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. तसेच दाभोलकर कुटुंबीयांनी केलेली याचिका निकाली काढली. आरोपपत्र दाखल झाल्यानंतर तपासावर न्यायालयाच्या देखरेखीची गरज नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तपासवरील देखरेख कायम ठेवायची की नाही याचा निर्णय घ्यावाच लागेल. असे न्यायालयाने या मुद्यावरील निर्णय राखून ठेवताना स्पष्ट केले होते.

**आरोपींचे म्हणणे काय होते ? :** कायद्यानुसार, आरोपपत्र दाखल झाल्यानंतर प्रकरणाच्या तपासावर उच्च न्यायालयाने देखरेख ठेवण्याची आवश्यकता नाही. याप्रकरणी तर खटला सुरु आहे. त्यामुळे प्रकरणाच्या तपासावर देखरेख ठेवण्याची आणि याचिका अमर्याद काळासाठी प्रलंबित ठेवण्याची गरज नसल्याचा युक्तिवाद आरोपींच्या वतीने करण्यात आला होता. सीबीआयने या प्रकरणाचा योग्य तपास केलेला नाही आणि त्यात बऱ्याच त्रुटी आहेत.

## मुंबई-नागपूर दरम्यान चालणार 'विशेष ट्रेन'

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई आणि नागपूर प्रवास करणाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. मध्य रेल्वेने या मार्गावर विशेष ट्रेन चालवण्याची घोषणा केल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही. प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते नागपूर दरम्यान विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्र. 02139 सुपरफास्ट स्पेशल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून 16 एप्रिल रोजी 00.20 वाजता सुटेल आणि त्याच दिवशी 15.32 वाजता नागपूरला पोहोचेल. तर दादर, ठाणे, कल्याण, नाशिकरोड, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तजापूर, बडनेरा धामणगाव आणि वर्धा या थांब्यांवर ही गाडी थांबणार आहे. या ट्रेनचं स्वरुप एक एसी 2-टायर, दोन एसी 3-टायर, 10 स्लीपर क्लास आणि 5 जनरल सेकंड क्लास (द्वितीय श्रेणी) असून दोन गार्ड ब्रेक व्हॅन देखील आहेत.





# काँग्रेसची मोर्चेबांधणी

आधुनिक केसरी

काँग्रेसने देशात जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी केली असून पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी सोमवारी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठविले. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीला बळ मिळाले आहे. संसदेमध्ये भाजपच्या काही खासदारांसह जनता दल (संयुक्त), राष्ट्रीय जनता दल, राष्ट्रवादी काँग्रेस आदी प्रादेशिक पक्षांसह काँग्रसने जातीनिहाय जनगणनेची मागणी यापूर्वीच केली होती. भाजपने ही मागणी फेटाळली आहे. खरगे यांनी आपल्या पत्रात याचा उल्लेख केला आहे. २०११-१२मध्ये तत्कालीन संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारने सामाजिक व आर्थिक तसेच, जातीनिहाय सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये २५ कोटी कुटुंबांचा समावेश होता. २०१४ मध्ये केंद्रात भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकार सत्तेत आल्यानंतर जातीनिहाय जनगणनेचे आकडे प्रसिद्ध केले गेले नाहीत. सामाजिक न्यायासाठी नवा माहिती-विदा आवश्यक असून त्यासाठी जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे, असे खरगेंनी पत्रात नमूद केले आहे.
२०१४ व २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत तसेच, उत्तर प्रदेश व अन्य राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत ओबीसी मतदार भाजपचा प्रमुख आधार राहिले आहेत. दलित, आदिवासी तसेच ओबीसी मतदारांनी काँग्रेसपासून फारकत घेतल्यामुळे दोन्ही लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या मतांचा टक्का घसरला.
ही घसरण रोखण्यासाठी काँग्रेसने जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली आहे. भाजपच्या हिंदूत्वाला छेद देण्यासाठी तसेच आगामी कर्नाटक विधानसभा निवडणुकीत ओबीसी जनगणनेचा मुद्दा उपयुक्त ठरेल, अशी काँग्रेसला अपेक्षा आहे.
रायपूरच्या महाअधिवेशनामध्येही पक्षांतर्गत ५० टक्के आरक्षण देऊन ओबीसी, दलित व आदिवासींना पदे देण्याची घोषणा काँग्रेसने केली होती. कर्नाटकच्या निवडणुकीनंतर पक्षांतर्गत फेररचनेला सुरुवात होण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी कर्नाटकमधील कोलारमध्ये अलीकडेच घेतलेल्या प्रचारसभेत ओबीसी जनगणनेची मागणी पुन्हा एकदा केली. २०१९च्या लोकसभा निवडणूक प्रचारावेळी तेथे झालेल्या सभेतच 'सगळय़ा चोरांचे आडनाव मोदीच कसे असते' असे विचारले होते. या विधानाचा वापर ओबीसी मतांच्या बळकटीसाठी भाजपकडून केला जात होता.
आता सुमारे चार वर्षांनी याच शहरात राहुल गांधी यांनी ओबीसींना भाजपपासून दूर नेण्यासाठी पहिले पाऊल उचलणे, हा एक वेगळाच 'योगायोग' बघायला मिळाला.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# पुलवामा हल्ला: निष्काळजीपणा की कट ?

आधुनिक केसरी

**जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी मोठा गौफ्यस्फोट केला आहे. मोदी सरकारच्या चुकीमुळं पुलवामा हल्ला झाल्याचं वक्तव्य सत्यपाल मलिक यांनी केलं आहे. प्रसारमाध्यमाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हा गौफ्यस्फोट केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारविरोधात सत्यपाल मलिक यांनी केलेल्या दाव्यांनी आज देशभरात खळबळ माजली आहे. सोशल मीडियावर सत्यपाल मलिक हे नाव जोरदार चर्चेत आहे. तसेच त्यांनी केलेल्या दाव्यांवरून विरोधक आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रश्न विचारत आहेत. विशेष म्हणजे सत्यपाल मलिक हे भाजपचे वरिष्ठ नेते आणि जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल आहेत.**

२०१९ मध्ये पुलवामा येथील सीआरपीएफ जवानांवर झालेल्या हल्ल्यात गृहमंत्रालयाची अक्षम्य चूक होती, त्यामुळेच हा हल्ला घडला, असा गंभीर आरोप त्यांनी केलाय. विशेष म्हणजे या प्रकरणावर मी बोलू नये, असाही दबाव आणला होता, असा गौप्यस्फोट सत्यपाल मलिक यांनी केलाय.
२०१९ साली पुलवामा येथे झालेल्या हल्ल्ल्यात ४० जवानांचा मृत्यू झाला. मलिक यांनी यासाठी सीआरपीएफ आणि केंद्रीय गृह मंत्रालयाला दोषी ठरवलंय. त्यावेळी राजनाथ सिंह हे गृहमंत्री होते. मलिक यांचा आरोप आहे की, सीआरपीएफने जवानांना घेऊन जाण्यासाठी विमान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली होती. मात्र गृहमंत्रालयाने नकार दिला.तसेच सीआरपीएफची तुकडी जाताना संबंधित मार्गाची योग्य रितीने तपासणी झाली नाही, असाही आरोप करण्यात आलाय.
याविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कॉल केला असता, मोदींनी त्यांना गप्प बसण्यास सांगितलं.. या हल्ल्याचा ठपका पाकिस्तानवर फोडून फोडून निवडणुकीत लाभ घेण्याचा सरकारचा हेतू होता, असा आरोपही सत्यपाल मलिक यांनी केलाय.
पाकिस्तानातून ३०० किलोपेक्षा जास्त आरडीएक्स घएऊन आलेला ट्रक १० ते १५ दिवस काश्मीरमध्ये फिरत होता, मात्र गुप्तचर विभागाला याचा सुगावाही लागला नाही, असा आरोप सत्यपाल मलिक यांनी केलाय.
सत्यपाल मलिक यांना मोदी सरकारने २०१७ मध्ये बिहारचं राज्यपाल केलं होतं. यानंतर २०१८मध्ये त्यांची जम्मू काश्मीरमध्ये बदली करण्यात आली होती. २०१९ मध्ये पुलवामा हल्ला झाला. २०१९ मध्ये भाजपा पुन्हा सत्तेत आल्यानंतर सत्यपाल मलिक यांच्यावर पुन्हा जबाबदारी सोपवण्यात आली. जम्मू काश्मीचा विशेष दर्जा काढून घेण्यात आला आणि इंटरनेट बंद करण्यात आलं होतं तेव्हा सत्यपाल मलिकच राज्यपाल होते. जेव्हा राज्य केंद्रशासित प्रदेश झाले तेव्हा मलिक यांची गोव्यातील राजभवनात बदली करण्यात आली. मलिकहे मेघालय आणि नंतर जम्मू-काश्मीरचं राज्यपालराहिले आहे. सत्यपाल मलिक यांनी 'वायर'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये हा दावा केला आहे. मलिक म्हणाले, त्यावेळी गृह मंत्रालयाने सीआरपीएफ जवानांसाठी विमाने दिली नाही. त्यांना ५ विमानांची आवश्यकता होती. मात्र, ही विमाने त्यांना दिली गेली नाही. ही मोठी चूक गृह मंत्रालयाने केल्यामुळे ४० जवानांना जीव गमवावा लागला. मला जर त्यांनी विचारणा केली असती, तर मी त्यांना एअरक्राफ्ट दिले असते, असं सत्यपाल मलिक म्हणाले. पुलवामा घटनेनंतर मोदींसोबत बोललो असता त्यांनी गप्प राहण्यास सांगितल्याचे देखील मलिक म्हणाले. तर अजित डोवाल यांनीही याबाबत मला गप्प राहण्यास सांगत या हल्ल्याचा आरोप पाकिस्तानकडे जाईल आणि याचा फायदा निवडणुकीत होईल, असे सरकारचे धोरण होते, असे मलिक म्हणाले.
दरम्यान सत्यपाल मलिक यांचा दावा आहे की, ते जम्मू-काश्मीरचे राज्यपाल असताना त्यांना दोन फाईल्स मिळाल्या होत्या. या फायलींमध्ये काही बेकायदेशीर पद्धतींचा अवलंब करण्यात आला. अशा परिस्थितीत या दोन्ही फायलींवर स्वाक्षरी करण्यासाठी त्यांना ३०० कोटी मिळू शकतात, अशी ऑफर देण्यात आली होती.
राम माधव यांच्यावर आरोप तसेच आरएसएस नेते राम माधव यांच्यावरही सत्यपाल मलिक यांनी गंभीर आरोप केलाय. एक दिवस राम माधव यांनी एका प्रकल्प मंजुरीच्या बदल्यात मला ३०० कोटी रुपये मिळू शकतात, अशी ऑफर दिली होती. मात्र मी ही ऑफर फेटाळून लावली, असं वक्तव्य सत्यपाल मलिक यांनी केलंय.

**विरोधकांनी मुद्दा उचलला**

सत्यपाल मलिक यांच्या आरोपांमुळे विरोधकांना मोदी सरकारविरोधात नवा मुद्दा मिळाला आहे. मलिक यांच्या आरोपांवरून काँग्रेस नेत्यांनी ट्विट करून पंतप्रधानांनी या आरोपांना उत्तर द्यावे, अशी मागणी केली आहे.
मलिक यांनी केलेला आरोप अत्यंत गंभीर आहे.मात्र मलिक आज पर्यंत गप्प का बसले.?मलिक यांनी केलेल्या आरोप तथ्य असेल नसेल तरी हा प्रश्न देशाच्या सुरक्षेशी निगडित असल्याने या गौ्यस्फोटाकडे दुर्लक्ष होता कामा नये.पंतप्रधान मोदींनी या.आरोपाचे उत्तर द्यायला पाहिजे. याकडे आता सर्व विरोधी पक्षांचे लक्ष लागले आहे. लोकसभा निवडणुका जिंकण्यासाठी देशाची एकता अखंडता व सुरक्षितता धोक्यात टाकून पूलावामा एपिसोड घडवून आणले असेल तर यासारखे दुर्दैव्य काय असू शकते.निवडणुका जिंकण्यासाठी देशाची सुरक्षा धोक्यात घालणे हा देशद्रोह च.पुलवामा हल्ल्यात पाकिस्तान उघडा पडला.हा हल्ला पाकिस्तान समर्थित दहशत वाद्यानी घडवून आणला.संपूर्ण जगाने पाकिस्तानला दोषी मानले.पुलवामा हल्ल्यात पाकिस्तान कसा सहभागी होता,है भारताने पुराव्यानिशी जगाला दाखवून दिले.हा पूर्वनियोजित कट होता.
फ्रंटलाइन' या इंग्रजी मासिकात फेब्रुवारी २०२१ च्या अंकात आनंदो भक्तो यांनी सरकारच्या गुप्तचर यंत्रणेच्या संदेशांची तपासणी केल्यानंतर उघड झाले की, या घटनेपूर्वी सरकारला ही गुप्तचर माहिती ११वेळा गुप्तचर यंत्रणेकडून मिळाली होती. असे काहीतरी होणार आहे हे माहीत होते. ही सर्व कागदपत्रे फ्रंटलाइन मासिकाकडे आहेत. आनंदो भक्तांचा हा तपास अहवाल सरकारने आजपर्यंत नाकारलेला नाही.



फ्रंटलाइनच्या लेखानुसार, जम्मू आणि काश्मीर पोलिसांना पहिला आणि दुसरा इशारा, पुलवामा घटनेच्या दीड महिना आधी, २ आणि 3३जानेवारी २०१९ रोजी, जम्मू आणि काश्मीर D.G.P. आणि काश्मीर रेंजचे आयजीपी. गुप्तचर अहवालावरून त्याचे नाव आढळून आले. दक्षिण काश्मीरमधील जैश-ए-मोहम्मद 'किसास मिशन' अंतर्गत बदला घेण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात आले. या इशाऱ्याचे गांभीर्य अधोरेखित करून अहवालात असे लक्षात आणून दिले आहे की, पुलवामा येथे सीआरपीएफने मागच्या वेळी असा इशारा दिला होता. छावणीवर हल्ला झाला. असे असताना मलिक यांच्या गौपयस्फोटात तथ्य किती असेल,याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.या पार्श्व भूमीवर सरकारने मलिक यांच्या आरोपाला उत्तर देवून आपली बाजू स्पष्ट करावी.मलिक यांनी केलेल्या गौ्यस्फोटाचा डंक अतिशय विषारी आहे.त्यामुळे पुढील निवडणुकीत पंतप्रधान नरेन्द्र मोदींना त्रास होवू शकतो.

# स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याचा अंदाज हा धोक्याचा इशारा

आधुनिक केसरी

**स्कायमेट या खाजगी संस्थेनंतर आता भारतीय हवामान खात्यानेही यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. देशात सरासरी ८७ सेंटीमीटर पाऊस पडतो. सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के पाऊस सर्वसाधारण मानला जातो. जून ते सप्टेंबर या महिन्यात सरासरीच्या ९३ टक्के पाऊस पडेल अशी शक्यता या दोन्ही संस्थेने वर्तवला आहे.**

अलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला जात आहे. केवळ भारतातच नाही तर जगातील अनेक देशात कमी पाऊस पडेल असाही अंदाज स्कायमेटने वर्तवला आहे. पॅसिफिक महासागरात सक्रिय असलेल्या अल निनोमुळे ऑस्ट्रेलिया, दक्षिण आशिया व भारताच्या काही भागात दुष्काळ पडण्याची भीतीही या अंदाजात वर्तवण्यात आली आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार आहे याचाच अर्थ ८७ सेंटीमीटरपेक्षा कमी पाऊस पडणार आहे. कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या आपल्या देशात हवामानाचा अंदाज खूप महत्वाचा ठरतो. भारतातील शेती पावसावर अलवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे आकाशाकडे लागलेले असतात. शेतीचं देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान १४ टक्के असते, तरी देशातील ७० टक्के रोजगार हे शेतीवर अवलंबून आहेत. जून ते सप्टेंबर या कालावधीत कमी पाऊस पडणार असला तरी पावसाचे आगमन वेळीच होणेही तितकेच महत्वाचे आहे. जर पावसाचे आगमन लांबले तर बळीराजाने केलेली पेरणी वाया जाते. पेरणी वाया गेली तर दुबार पेरणीचे संकट उभे राहते. शिवाय परतीचा पाऊसही महत्वाचा आहे. परतीचा पाऊस धुमाकूळ घालतो त्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाया जाते असेच चित्र आपण मागील काही वर्षांपासून पाहत आहोत.
सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आणि त्यात जर पावसाचे आगमन लांबले किंवा परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला तर हे वर्ष बळीराजासाठी जिकरीचे ठरू शकते. आधीच अवकाळी पावसाने कंबरडे मोडलेला बळीराजा स्कायमेट आणि हवामान



खात्याच्या या अंदाजामुळे आणखी निराश झाला आहे. यंदा पुरेसा पाऊस झाला नाही, तर कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या बळीराजासाठी हा मोठा धक्का असेल. स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरला, तर देशाची अर्थव्यवस्थाच कोलमेडल. पाऊस कमी झाला तर महागाई वाढेल. शिवाय पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होईल. यावर्षी पाऊस कमी होण्याची शक्यता असल्याने पाणी जपून वापरावे लागणार आहे. आहे त्या पाण्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे.
यावर्षी देशाला उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागेल असा हवामान खात्याचा अंदाज खरा ठरताना दिसत आहे. उष्णतेच्या लाटेचा परिणाम जलसाठ्यावर होणार आहे. उष्णतेप्रमाणेच कमी पावसाचा अंदाज जर खरा ठरला देशात पुन्हा दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण होऊ शकते. चार पाच वर्षांपूर्वी आपण दुष्काळाची दाहकता अनुभवली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना दाही दिशा फिरावे लागत होते. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती ती स्थिती पुन्हा उदभवू द्यायची नसेल तर प्रशासनाने पाणी वाटपाचे आत्तापासूनच योग्य नियोजन करायला हवे. लोकांनीही त्याला साथ द्यायला हवी. पाणी वाया न घालवता पाणी बचत करून संभाव्य पाणीटंचाईला तोंड देता येऊ शकेल. एकूणच कमी पावसाचा स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याचा अंदाज भारतासाठी धोक्याचा इशारा आहे.

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## नागपुरात काँग्रेसची तीव्र निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भाजपचे वरिष्ठ नेते व जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्य सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यावर पुलवामा घटनेबाबत व संघाचे राम माधव यांच्यावर ३०० कोटींच्या प्रस्तावाबाबत केलेले आरोप अत्यंत गंभीर आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबतचे सत्य लोकांना सांगावे, अशी मागणी करीत शहर काँग्रेसने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. शहराध्यक्ष विकास ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर मोदी सरकारच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. यावेळी कार्यकर्त्यांनी हातात पक्षाचे झेंडे घेऊन केंद्र सरकारचा निषेध केला.पुलवामामध्ये २०१९ मध्ये ४० जवानांचे प्राण गेले. त्यात सरकारची चूक होती हे सत्यपाल मलिक यांनी निदर्शनास आणून दिले असता केंद्रातील मोदी सरकारने त्यांना गप्प राहण्यास सांगितले. जवानांना दुसरीकडे पाठवण्यासाठी विमानाची मागणी केली असता ती का नाकारण्यात आली ? सर्वात महत्त्वाचे या घटनेत वापरले गेलेले ३०० किलो आर.डी.एक्स. कुठून आले? असे अनेक प्रश्न सत्यपाल मलिक यांच्या खुलाशानंतर निर्माण झाले आहेत. पुलवामा घटना व ४० जवानांचे बलिदान भाजप व नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी केले का, या सर्व प्रश्नांचे उत्तर जनतेला मिळायला हवेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघटन सरचिटणीस राम माधव यांनी ३०० कोटी रुपयांच्या लाचेचा प्रस्ताव दिला होता, हा आरोपही गंभीर आहे. या प्रश्नाचे उत्तर मोदी सरकारने जनतेला द्यावे, असेही आमदार विकास ठाकरे म्हणाले. या आंदोलनात प्रामुख्याने प्रदेश विशाल मुत्तेमवार, अतुल कोटेचा, उमाकांत अग्निहोत्री, प्रदेश सचिव प्रशांत धवड, रमन पैगवार, शहर महिला अध्यक्षा नॅश अली, प्रा. दिनेश बानाबाकोडे यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# गिरजा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा

### निवेदन देऊनसुद्धा महसूल व पोलीस अधिकाऱ्यांची शून्य कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार बडोदबाजार पोलीस ठाणे हीत व मंडळ अधिकारी तथा तलाठी सजा वडोद बाजार पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये मध्ये वडोदबाजार, वडोदखुर्द भालगाव कविटखेडा, शेवता खुर्द, शेवता बु बोरगाव गणपती, पेंडगाव पाडळी जळगाव मेटे, निमखेडा या गावातील गिरजा नदी पात्रातून होणारा बेसुमार वाळू उपसा थांबविण्यात यावा. या गिरजा नदी पात्रातून रोज रात्री टैक्ट्ररच्या च्या साह्याने हजारो ब्रास वाळू उपसा चालू आहे. या मुळे शासनाचे लाखो रूपयाचे महसूल बुडत आहे. गावातून जर कोणी वाळू माफिया विरोधात तक्रार केली व बातमी छापल्यास आम्ही त्यांना पाहून घेउ अश्या धमक्या देतात. याकडे महसूल विभाग व पोलीस प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करताना निदर्शनास आहे. रोज रात्री १० वाजे नंतर वाळू माफिया गिरजा नदी पात्रातून वाळू उपसा करण्यास सुरूवात करून सकाळ होई पर्यंत वाळू उपसा चालू असतो त्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळेस टॅक्टरच्या आवाजा मुळे फार त्रास होतो. या कामी वाळू माफिया यांनी रात्रीच्या वेळेस लोकेशन करण्यासाठी जागोजागी माणसे ठेवलेली असतात त्यांना पोलीस प्रशासन पेट्रोलींग करत असताना त्यांची साधी चौकशी / विचारपूस सुध्दा करीत नाही. गिरजा नदी पात्रातील अवैध वाळू उपस्या मुळे शेतकयांचे विहीरीचे पाणी पातळी खोल गेली असून काही शेतकऱ्यांची पाईप लाईनचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. तरी, संबंधित अधिकारी साहेबांनी मौजे वडोदबाजार व परिसरातील गिरजा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा पोलीस व महसूल यांच्या आशीर्वादाने होत असून लाखो रुपयाची वाळू माफिया वाळू चोरून घेऊन जात आहे त्यामुळे वाळू माफियांना अच्छे दिन आले आहे वाळू माफिया विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. निवेदनाद्वारे मागणी फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( डि.)फुलंब्री तालुका अध्यक्ष रमेश शंकर दनके यांनी जिल्हाधिकारी कार्यालय विभागीय आयुक्त कार्यालय पोलीस अधिक्षक ग्रामीण छत्रपती संभाजी नगर तहसील कार्यालय फुलंब्री यांच्याकडे लेखी तक्रार दिलेली आहे सदरील वाळू माफिया लाखो रुपयांचे ट्रॅक्टरच्या सहाय्याने वडोद बाजार परिसरामध्ये गिरजा नदी पात्रामध्ये वाळू उपसा होत असून यावर संबंधित अधिकारी कारवाई करणार का अशी नागरिकांकडून अपेक्षा होत आहे.

## नवनिर्वाचित चेअरमनपदी रऊफ शेख पटेल यांची निवड

### जानेफळ सोसायटी निवडणुकीत कृष्णा गावंडे यांच्या पॅनलचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील जानेफळ येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या तेरा संचालकांपैकी नऊ संचालकांनी सहीनिसी जिल्हा उपनिबंधककडे अविश्वास ठराव.7 फेब्रुवारी रोजी दाखल केला होता, त्याची चर्चा बैठक विशेष सभा ३ मार्च रोजी बोलविण्यात आली होती.यात नऊपैकी तीन असा ठराव पारित करण्यात आला.तेरा संचालकांपैकी एक संचालक मृत असून नऊ संचालक विशेष सभेत उपस्थित होते. सोसायटीचे अध्यक्ष भाऊसाहेब वेताळ, सोमीनाथ खिल्लारे व शिवाजी जेठे हे तीन संचालक गैरहजर होते. जिल्हा उपनिबंधक डॉ मुकेश बारहाते छ.संभाजीनगर, उपनिबंधक फुलंब्रीचे रोडगे यांच्या उपस्थितीत अविश्वास ठराव प्रक्रिया पार पडली. चेअरमन पदाची निवड प्रक्रिया 31मार्च ठेवण्यात आली होती. 31मार्च रोजी चेअरमन पदाची निवड करण्यात आली . नव्याने चेअरमनपदी रऊफ शेख याची सर्वां मते निवड करण्यात आली. संचालक कृष्णा पाटील गावंडे, दिगाबर खिल्लारे, अनुराधा चव्हाण, आनंद अदबाने, गंगाधर भागाजी, नामदेव गायकवाड, शिवाजी जेठे, भागीत्राबाई वेताळ उपस्थिती होती तर गावकरी आप्पासाहेब वेताळ, जावेद पटेल,लहु वेताळ, शिवाजी वेताळ, दाउत शेख, शगीर शेख आधी गावाकऱ्याची मोठ्या संख्येने उपस्तिति होती. जानेफळ येथील सोसायटी चेरमन पदाची निवड जाहीर. भाऊसाहेब वेताळ याच्या जागी रऊफ शेख याची चेरमन पदी निवड जानेफळ येथील विविध कार्यकारी युवा सदस्यांना विश्वासात घेत नसल्यामुळे अविश्वास ठराव पारीत झाल्यानंतर नव्याने चेअरमन पदी रऊफ शेख याची सर्वां मते निवड करण्यात आली.


















# महाराष्ट्र भूषण की महाराष्ट्र भीषण ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र भूषण पुरस्कार लाखो लोकांच्या उपस्थितीमध्ये, शासकीय खर्चाने, मोठ्या जाहिराती करून पार पाडला. परंतु महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण समारंभामध्ये खरंच महाराष्ट्राचे भूषण वाढले की महाराष्ट्रात भीषण घडले हे बघणे आवश्यक आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरी पुरस्कार. हा पुरस्कार प्रदान करताना पुरस्कार सभारंभाला कोणतेही गालबोट लागणे म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राची मानहानी होय.  महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा निवडीपासूनच दरवर्षी वादग्रस्त असतो. एकीकडे नाव महाराष्ट्र भूषण देऊन दुसरीकडे मात्र हा पुरस्कार बहुतांश एकाच जातीत दिला जातो.**

महाराष्ट्र भुषण कुणाला दिला जातो याबद्दल बोलले तर जातिवाद होतो. परंतु एकाच जातीला दरवर्षी पुरस्कार दिल्याने जातिवाद होत नाही. अशी विषमतावादी व्यवस्था टिकवून ठेवण्याचे काम सरकार करत आहे. अर्थात हेच सरकार जातिवाद करून एकाच जातीच्या माणसाला महाराष्ट्र भूषण देतात असे मुळीच नाही 1995 ला महाराष्ट्र भूषण ला सुरुवात झाली तेव्हापासून तर आजतागायत बहुतांश पुरस्कार एकाच जातीला मिळाले. स्वतःला पुरोगामी राज्य समजायचे आणि पुरस्कार मात्र एकाच जातीला द्यायचे, यामधून आपण पुरोगामी आहोत की ढोंगी आहोत हे सिद्ध होते. आणि जर महाराष्ट्र भूषण पुरस्कार दरवर्षी एकाच जातीला मिळत असेल तर यातून महाराष्ट्राचे भूषण होईल का ? किंवा जेथे आपण म्हणतो जातिवाद संपलेला आहे तर एकाच जातीला पुरस्कार देऊन सरकारला नेमके काय साध्य करायचे आहे ?  महाराष्ट्र भूषण पुरस्कार देताना कोणतेही जनमत न घेता विज्ञान, तर्क व समाजामध्ये जनजागृती करणाऱ्या इतर जातीतील लोकांना पुरस्कार न देता आजही सरकार सामाजिक अन्याय करत आहे. पुरस्काराच्या माध्यमातून आपण जर एक नजर ज्या ठिकाणी आरक्षण नाही अशा ठिकाणावर टाकली तर आपल्या लक्षात येईल ज्या ठिकाणी आरक्षण नाही त्या ठिकाणी एकाच जातीचे वर्चस्व आजही कायम दिसते. याचाच अर्थ आजही सामाजिक समता, सामाजिक न्याय, देण्याची नैतिक जबाबदारी तर कर पार पाडत नसून आजही विषमता टिकवून ठेवली जाते अशा अनेक बाबी आहेत की ज्या बाबी महाराष्ट्रासाठी भूषणीय नाहीत. तरीही त्या घडल्या जातात. अंधश्रद्धा, पाखंड आणि अध्यात्मिक कामे करणाऱ्यांना महाराष्ट्र भूषण देऊन धर्मनिरपेक्षता व लोकशाहीची हत्या केली जाते. हे उघड सत्य असतानाही लोकांना धर्माच्या नावाखाली मानसिक गुलाम बनवल्याने लोकांना या बाबीची आकलन होत नाही. यावर्षीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रम महाराष्ट्रासाठी भूषण आहे की भीषण आहे, हे मनाचा प्रामाणिकपणा उघडा ठेऊन बघणे आवश्यक आहे.  2024 ची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या नावाखाली शक्ती प्रदर्शन करण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आला. म्हणजेच सध्याच्या परिस्थितीचे राजकारण किती खालच्या स्तराला जाऊन, सत्तेची पोळी भाजून घेण्यासाठी काय काय करतील याची काही शाश्वती नाही. आणि हाच प्रकार महाराष्ट्र भूषण पुरस्कार कार्यक्रमांमध्ये दिसून आला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पंधरा कोटी रुपयांच्या वर पैसा खर्च करून त्यामध्ये 25 लाख रुपये रोख पुरस्कारची सन्मान निधी बाजूला काढला तर, उर्वरित रक्कम नेमकी खर्च तरी कुठे झाली ? लाखो लोक कार्यक्रम ला येणार याची माहिती असताना देखील, आणि उन्हाळा सुरू असून 40 डिग्री सेल्सिअस पर्यंत तापमान जात आहे याची माहिती असून सुद्धा लोकांना राजकीय पोळी भाजण्यासाठी उन्हामध्ये बसून ठेवले जाते. लोकांच्या डोक्यावर सावलीसाठी छत बनवले जात नाही. आणि नेत्यांना मात्र एसी असतात. एकीकडे नेत्यांना ऐशोआराम आणि सर्वसामान्य जनतेला 40 डिग्री सेल्सिअस तापमानावरती उन्हामध्ये बसवल्या जाते. उन्हाळ्यामध्ये लोकांना उन्हामध्ये बसवायचं की त्यांच्या बसण्याची सोय करायची हे ज्यांना कळत नाही, त्या लोकांना खरंच सत्तेत राहण्याचा अधिकार आहे का ? किंवा नेते एसीमध्ये, जनता 40c तापमानामध्ये डोक्यावर कोणतीही सावली नसताना बसवून ठेवणे यातच महाराष्ट्राची भूषण आहे का ? दुसरी व महत्त्वाची गोष्ट जर महाराष्ट्र शासनाने या कार्यक्रमावरती खर्च केला नसता तर समजून शकलो असतो, कार्यक्रमाला अपेक्षेपेक्षा जास्त गर्दी आल्याने गर्दी झाली, व घटना घडली. परंतु 15 कोटी पेक्षा जास्त पैसा खर्च करून लोकांना बसण्याची व्यवस्था निर्माण करू शकले नाही. तर मग पंधरा कोटी रुपये नेमकी गेले कुठे हा प्रश्न तर सर्वसामान्य जनता विचारणारच आहे. सरकारच्या या निष्काळजीपणामुळे राजकीय पोळी भाजण्याच्या उद्देशाने जमवलेल्या गर्दीतील शेकडो लोकांना उष्माघाताचा फटका बसून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले. यापैकी बरेचसे लोक मृत्युमुखी पडलेत. शासनाने आकडा जरी कमी दिलेला असला तरी मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या ही चिंताजनक आहे, हे मात्र नक्की. कारण 40 डिग्री सेल्सिअस तापमानामध्ये चार-पाच तास लोकांना बसून ठेवणे, सावलीची कोणतीही सोय नसणे, आणि 500 पेक्षा जास्त लोक हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्याची कबुली सरकारने देणे, ही बाब महाराष्ट्रासाठी भूषणीय आहे की भीषण आहे ?  हे जनतेने ठरवावे. उष्माघाताने मृत झालेल्या लोकांना पाच लाख रुपयांची शासकीय मदत देऊन एका जीवाची किंमत सरकारने पाच लाख रुपये ठेवली. हे लोक उष्माघातामुळे नाही तर सरकारच्या नियोजन शून्य कारभारामुळे मृत्यूमुखी पडलेत. याची नैतिक जबाबदारी घेऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व केंद्रीय गृहमंत्री राजीनामा देतील का  ? वीस पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू होऊन ही गोष्ट इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून व अनेक प्रिंट मीडियाच्या माध्यमातून सुद्धा टाळली जाते. एवढा मोठा दबाव जर प्रसार माध्यमावर असेल तर हे तर हे महाराष्ट्राचे भूषण वाढवणारे आहे का ?  सदर घटना उष्माघाताने मृत्यूची नव्हे तर राजकीय हत्येची आहे असे म्हणावे लागेल. किंवा लोकांना मारून लोकांचे हाल करून स्वतःची प्रसिद्धी मिळवने, हे निच राज्यकारणाचे लक्षण होय. तिसरी आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट महाराष्ट्र भूषण पुरस्कार राज्यातला सर्वोच्च पुरस्कार आहे. आणि हा पुरस्कार मुख्यमंत्री राज्यपाल यांच्या यांच्या हस्ते मिळायला पाहिजेत. परंतु महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्याचे जर आपण फोटो बघितलेत तर त्यामध्ये मुख्यमंत्री शोधावे लागतात. एकीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, तर दुसरीकडे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. शिंदे साहेबांना फोटोमध्ये शोधावे लागते, अशा ठिकाणी ते आहेत. मुख्यमंत्र्यांना डावलू ना उपमुख्यमंत्र्याच्या हस्ते पुरस्कार दिला जातो, ही बाब महाराष्ट्राचे भूषण वाढवणारी आहे ? एकनाथ शिंदे यांना फक्त पद दिलेले आहे पोझिशन मात्र त्यांच्याकडे असल्याचे दिसत आहे. याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर आलेले आहेत. आणि पुन्हा एकदा ते सत्य महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण समारंभामध्ये सुद्धा समोर आलेले आहे. मुख्यमंत्र्यालाच बाजूला सारून उपमुख्यमंत्री जर सर्वच कामे करत असेल तर ही बाब महाराष्ट्रासाठी भुषणीय आहे की भीषण आहे ? हे बघणे आवश्यक आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण कार्यक्रमांमध्ये उष्माघाताचा फटका बसून मृत्यू झालेल्या लोकांची घटना विदारक आहे. विदारक व मन हे लावून टाकणाऱ्या आणि सरकारचा नाकर्तेपणा दाखवणाऱ्या घटनेवर कोणीही चर्चा कोणतीही बातमी होत नाही. आणि तरीही महाराष्ट्र भूषण मोठ्या गौरव आणि दिला जातो. महाराष्ट्र भूषण कार्यक्रमांमध्ये मुख्यमंत्र्यांना डावलले जाते, लोकांना बसण्याची सोय केली जात नाही, मृत्त झालेल्या लोकांना पाच लाख रुपये देऊन बोळवणी केली जाते, या सगळ्या बाबी जर बघितल्या तर यामध्ये सरकारचे अपयश आहे. हे सरकार फक्त स्टंटबाजी करून स्वतःची जाहिरात करण्याचा प्रयत्न करत आहे. 2024 ची निवडणूक लढण्यासाठी वाटेल ते प्रयोग घडवून आणून फक्त पक्षाची व नेत्याची जाहिरात कशी होईल यावर लक्ष दिले जातआहे. आणि सदर बाब आदर्श राजकारणासाठी, राज्य कारभारासाठी आणि समाजाच्या विश्वासासाठी घातक आहे. परंतु सत्तेची मस्ती असणारे लोक सुन्न झालेले आहेत. लोकांच्या समस्या बाजूला ठेवून स्वतःच्या ऐश्वर्या कडे, सत्तेच्या माध्यमातून चुकीचे कामे करण्याकडे, भर दिला जात आहे. हिच महाराष्ट्रासाठी चिंतेची बाब आहे. म्हणून महाराष्ट्र भूषण की महाराष्ट्रात भिषण हे लोकांनी ठरवणे आवश्यक आहे.



# बसवेश्वर महाराजांच्या कार्याच्या अनुकरणाची नितांत गरज



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**बसवेश्वर महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ नसल्यामुळे न्याय प्रीय राजा होते. बसवेश्वर महाराज हे बसव,बसवण्णा इत्यादी नावाने ओळखले जात असले तरीही थोर समाजसुधारक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यामुळे त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहे. इ.स.११०५ ते ११६५या कालखंडात होऊन गेलेले कर्नाटकातील संत व समाजसुधारक होते. त्यांनी नेहमी निर्गुण व निराकार एकेश्वरवाद श्रध्देचा पुरस्कार केला. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली वीरशैव कुटुंबात बसवेश्वर महाराजांचा जन्म झाला.  मुख्यत्वेकरून त्यांचा जन्म अक्षतृतीयेला झाला.अक्षतृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक व महत्वाचा दिवस मानल्या जातो.**

त्यामुळे या दिवसाला शुभ मानण्यात येते. बसवेश्वर कर्मठ विधीचा विरोध करायचे अशा परिस्थितीत मुंजीचा विरोध करून मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे असे सांगत वयाच्या ८ व्या वर्षी घर सोडून ते कूडलसंगम येथे निघून गेले.कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते.तेथे बसवेश्वरांनी १२ वर्षे वास्तव्य केले.कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा,धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा प्रगल्भ अभ्यास केला.त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला व त्यानंतर सोलापूरातील मंगळवेढा येथे आले. बसवेश्वरांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद स्थापन केली. या संसद मंडपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करायची यावर चर्चा करून व योग्य निर्णय घेवून पुढील कार्य होत असे.बसवेश्वर यांचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे समाजातील वाईट चालीरितीचा विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याकडे जास्त महत्त्व देत असे.१२ व्या शतकातील आदर्श,समतेचे, जनकल्याणाकारी प्रणेते म्हणून बसवेश्वर महाराज ओळखले जायचे. त्यामुळेच १२ व्या शतकापासून खऱ्या अर्थाने लोकशाहीला सुरूवात झाल्याचे सांगण्यात येते. कारण लोकशाहीमध्ये समता,मुल्य,न्याय,बंधूंता, एकात्मता, संपूर्ण स्वतंत्र, अधिकार,नियम, नियंत्रण, शिस्त,सूशासन व योग्य प्रशासन यामुळे समाज व देश घडण्यास मोठी मदत मिळते. बसवेश्वर महाराजांच्या संसदेत जातीभेला बीलकुलच थारा नव्हता.त्यामुळे त्यांना समाजाला एकत्र बांधण्यास मोठी मदत मिळाली. कारण कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते कदापि सहन करत नसे.आपल्याला २१ व्या शतकात जे कायदे दिसतात त्यात बसवेश्वर महाराजांचा मोठा वाटा आहे.बसवेश्वर महाराजांना साक्षात नंदीचा अवतार मानल्या जाते.आपण ज्याला शंकरजीच वाहन म्हणतो.भगवान शंभर या पृथ्वीचा,मानव, पशुपक्षी व जीवजंतू यांचा पालनहार आहे.त्यांच्या सोबत नंदी म्हणजे साक्षात परमेश्वर बसवेश्वर महाराज म्हणजे ही दैवी लीलाच म्हणावी लागेल.कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगमावर असलेल्या गुरूकुलात ज्ञानी गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले.विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला.त्यामुळेच त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधुन लिहिली.बसवेश्वर महाराजांनी नेहमी आध्यात्मिक जीवन व समाज घवीण्याच्या चालीरीतीचे मार्गदर्शन नेहमीच करीत असे.कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात आपल्याला लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झाल्याचे दिसून येते.सत्ता वैभव आणि कीर्ती याला एतकींचीतही वाव न देता आध्यात्मिक व नीतिमुल्याला प्रथम प्राधान्य देवून समाज हितासाठी अहोरात्र प्रयत्न केले. बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीयांना शुद्र, बहिष्कृत समजले जायचे.त्यांना स्त्रीयांवर होत असलेला अत्याचार सहन झाला नाही.याकरीता त्यांनी या विरूद्ध मोठा लढा उभारून मोठे भरीव कार्य केल्याचे दिसून येते.तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२ व्या शतकात घडला. त्यामुळे बसवेश्वर महाराजांचे प्रत्येक कार्य व त्यांची जीवनशैली आज समाजाला प्रेरणादायी ठरू शकते.आज देशातील राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन समाज हितांचे व देश हिताचे कार्य करण्याची नितांत गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे अनुकरण करून भ्रष्टाचार व वाजवीपेक्षा जास्त चल-अचल संपत्तीचा त्याग करून सरकारी तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे व महात्मा बसवेश्वरांचे आदर्श सामोरं ठेऊन समाजकार्य केले तरच खऱ्या अर्थाने राजकीय पुढाऱ्यांमार्फत बसवेश्वर महाराजांची जयंती साजरी झाली असे गृहीत धरले जाईल.कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ समाजसेवक, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी अशी मोठी जबाबदारीची आणि नामांकित पदे आहेत. त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी व्हायलाच हवा.बसवेश्वर महाराजांजवळ कोणतेही पद नसताना समाज हितासाठी अहोरात्र कार्य केले. कारण ते त्यागी, निष्ठावान,महान समाजसेवक व समाजसुधारक होते.त्यांचे अनुकरण करून आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची नितांत गरज आहे.वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय्य तृतीया यांच दिवशी महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला.त्याचप्रमाणे याच दिवशी पराक्रमी भगवान परशुराम यांचाही जन्म झाला हा एक संयोगच म्हणावा लागेल.

अक्षय्य तृतीया या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून, महात्मा बसवेश्वर आणि भगवान परशुराम यांच्या जयंतीचे शुभ संकेत लक्षात घेता व रमजान ईदचा पावन दिवस पहाता या भारत भुमित आजच्या दिवशी प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन आगळावेगळा ऐतिहासिक उपक्रम राबवुन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प संपूर्ण मानवजातीने करायला हवा.कारण मानवजातीच्या कल्याणासाठी आज चार दैवी शक्ती एकत्र विराजमान आहेत. त्यामुळे चार दैवी शक्तीचा( अक्षय्य तृतीया, बसवेश्वर जयंती,परशुराम जयंती, रमजान ईद) हा दिवस कधीच पहायला मिळणार नाही असा संयोग दिवस २२ एप्रिल ला उजाडला आहे. यामुळे प्रत्येकांनी वृक्षारोपण करून मानवजातीचा धर्म पाळला पाहिजे. यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व मानवजातीचे कल्याण होईल, गुरांना मोठ्या प्रमाणात चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा व सावली मिळेल.यातच आपल्याला अक्षय्य तृतीया,महात्मा बसवेश्वर,भगवान परशुराम,रमजान ईदचे दर्शन घडुन येईल यात दुमत नाही. कारण संपूर्ण वृक्षांच्या जळामुळात,फळात,फुलात,पाणात व झाडांच्या कनाकनात आपल्याला थोरमहात्मांचा,साधुसंतांचा व देवीदेवतांचा वास अवश्य दिसून येईल.



# झोपेचं झालं खोबरं



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कधी काळी आपल्या सर्वांची झोप म्हणजे एकप्रकारची संपत्ती, ठेव होती. लोक रात्री लवकर झोपून पहाटे लवकर उठून कामाला लागत. शंभर वर्षांचं आयुस्य धरलं तर आठ तास झोपेच्या अधीन राहून आपले पूर्वज 25 वर्षे अंथरुणात घालवत होते. बाकी तास कामाला देत. पण अलिकडच्या काही शतकात झोप न येणं किंवा झोपेची समस्या निर्माण होणं, यात सातत्याने वाढत होत आहे. भारतात कमी झोप किंवा चांगली झोप न येणं ही समस्या अन्य देशांच्या तुलनेत अधिक आहे. जगभरातल्या झोप घेण्याच्या पद्धतीवर एसी नील्सन यांचे एक सर्व्हेक्षण सांगते की, भारतातले 64 टक्के शहरी सकाळी सात वाजण्याच्या अगोदर उठतात. जगभरातील ही सर्वाधिक संख्या आहे.**

आधुनिक केसरी

सर्व्हेक्षणात आणखी एक गोष्ट समोर आली आहे, ती म्हणजे 61 टक्के लोक 7 तासांपेक्षा कमी झोप घेतात. आधुनिक जीवनशैलीमुळे स्लीप डिसऑर्डर ही एक गंभीर समस्या बनून पुढे येत आहे. आकडे सांगतात की, संपूर्ण जगच पहिल्यापेक्षा कमी झोप घेत आहे. गेल्या सत्तर वर्षांमध्ये माणसाच्या झोप घेण्याच्या प्रमाणात सुमारे वीस टक्के घट आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल सांगतो की, जगभरातले आठ कोटी लोक झोपेच्या आजाराने ग्रस्त आहेत. नॅशनल स्लीप फौंडेशन यूएसनुसार काही अपवाद सोडले तर सामान्य लोकांना सात ते नऊ तास झोप घेणं आवश्यक आहे. जर्नल ऑफ इंडियन ॲकेडमी ऑफ न्यूरोलॉजी च्या एका अभ्यासानुसार देशात या घडीला 10-15 टक्के लोक झोपेच्या अनियमिततेचे शिकार आहेत. यात महिलांचे प्रमाण अधिक आहे.

एशियन स्लीप रिसर्च सोसायटीनुसार झोप न येण्याच्या कारणांमध्ये जीवनशैलीमधील विविधता, चोवीस तासांची सक्रियता, आजूबाजूच्या परिसरात अधिक प्रमाणात प्रकाशयोजना, मोबाईल प्रेम, नेटवर दिवस-रात्र आणि सातत्याने वाढत चाललेले कामकाजाचे प्रमाण आदींचा समावेश आहे. जरा अधिक विस्ताराने पाहिल्यास , आपल्या लक्षात येईल की, टेक्नॉलॉजी आणि गॅझेट्स यांनी माणसाचे जीवन पूर्णपणे प्रभावित करून टाकले आहे. फोन, लॅपटॉप आणि टॅबलेट यांनी आपल्या शरीराच्या जैविक घड्याळामध्ये ढवळाढवळ सुरू केली आहे. जीवनशैली जसे की झोपण्याची निश्चित वेळ नसणे, रात्री उशिरापर्यंत काम करणे, रात्री उशिरापर्यंत पार्टी करणे, खाण्यात अनियमितपणा, जंकफूडचे वाढते प्रमाण अशी खूप मोठी कारणे झोप न येण्याबाबतची आहेत. एकटेपणामुळे निर्माण होणारी असुरक्षितता, एकटेपणा किंवा उपेक्षित राहण्याची भावना



आदींमुळे डोळ्यांवरची झोप उडून जाते. कृत्रीम विजेने दिवस-रात्रीचा फरक मिटवला आहे. झोपताना घरात अधिक प्रकाश असणे, ट्यूबलाईट लावून झोपणे या गोष्टी चांगल्या झोपेमध्ये बाधा आणतात. याशिवाय अनेक प्रकारचे तणावदेखील झोपेचे खोबरे करून टाकतात.

कधी नोकरी तर कधी पैशांचा तणाव, कधी नात्यांतून तणाव, एंग्जाइटी आणि नैराश्यसारख्या भावनात्मक समस्या ही झोप न येण्याची मोठी कारणे आहेत. पण तुमची दिनचर्या आणि तुमचे आरोग्यदेखील यात महत्त्वाची भूमिका निभावत असतात. काही औषधे-गोळ्यादेखील झोपेला अडसर ठरतात. नैराश्य, उच्च रक्तदाब, हायपरथायरॉइडिज्म आदींच्या उपचारांसाठी घेतली जाणारी औषधे, गर्भ निरोधक गोळ्या आणि कार्टिकोस्टेरॉइडदेखील अनिद्रेला कारण ठरत आहेत. त्यामुळे ज्यांना झोप कमी येत आहे, त्यांनी सावध व्हायला हवे. कारण ही केवळ तुमचीच समस्या नाही, तर संपूर्ण देशाचीच समस्या बनली आहे. अभ्यास सांगतो की, झोप न आल्याने आपल्या आरोग्याचे जे चक्र आहे, त्यात गडबड होते आणि हे आपल्या देशाचा जीडीपीदेखील कमी करतो. आपण आरोग्यावर पाण्यासारखा पैसा खर्च करत आहोत. हे आपल्या विकसनशील देशाला परवडणारे नाही. डॉक्टर सांगतात की, जर आपण कमी झोप घेतली तर त्या अवस्थेत मेंदूतून निघणारा जो आपल्या भुकेचा सेंस कंट्रोल करतो, तो हार्मोन प्रभावित होतो. यामुळे माणूस अधिक खातो, मग पचनासंबंधीच्या समस्या निर्माण होतात. पुढे हळूहळू हायपरटेन्शन,साखर आणि उच्च रक्तदाबसारखे आजार शरीराला घेरायला लागतात.

झोप ही विश्रांती, तजेलेपणाबरोबरच इतर अनेक लाभ देते, हे वैज्ञानिक प्रयोगांमधून सिद्ध झाले आहे. गाढ झोपेत शरीरात वृद्धीसंप्रेरके निर्माण होतात आणि त्यामुळे वार्धक्य दूर राहते. 'डोपामाइन' नावाचे संप्रेरक झोपेदरम्यान स्रवते, त्यामुळे वेदना कमी होतात. झोप वेदनाशामक आहे. दिवसभरातील शारीरिक, मानसिक, भावनिक ताण रात्रीच्या समाधानकारक झोपेनंतर दूर होतात, हे वैज्ञानिक सत्य प्रत्येकजण अनुभवतो. इंग्रजीत 'स्लीपिंग ऑन अ प्रॉब्लेम' हा वाक्प्रचार यथार्थ आहे. उत्तम झोपेमुळे स्मरणशक्ती शाबूत राहते, वाढते. वरील सर्व गुणधर्मामुळे आपले मानसिक, भावनिक स्वास्थ्य जोपासण्यात येते. अनेक संशोधनांती आढळले आहे की, अपूर्ण, असमाधानकारक झोपेमुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलता, हृदयविकार इत्यादी विविध आजार होऊ शकतात. आपली झोप अतीव महत्त्वाची आहे, तिचा मनापासून स्वीकार व आदर करा आणि स्वास्थ्यपूर्ण, चिरतरुण आयुष्य मिळवा, हा संदेश आपल्या पूर्वजांपासून आधुनिक विज्ञानापर्यंत सांगितला गेला आहे. कमी झोपेमुळे स्मरणशक्तीवरदेखील परिणाम होतो. मुलांच्याबाबतीत तर योग्य प्रमाणात झोप महत्त्वाची आहे. आजच्या युवकांमध्ये स्लीप डिसऑर्डरचा त्रास वेगाने वाढत आहे. झोप कमी होत असल्याने मुले आणि युवक अधिक इमोशनल होतात. अधिक वयाच्या लोकांमध्ये अन्य आजार आणि तणाव यामुळे झोपेवर परिणाम झालेला असतो. झोप पूर्ण न झाल्याने स्ट्रोकचा धोका वाढतो. लठ्ठपणा वाढण्यालादेखील झोपेचा अपूर्णपणा कारणीभूत आहे. आपल्याला चांगले आरोग्यपूर्ण जीवन जगायचे असेल तर पूर्ण प्रमाणात झोप महत्त्वाची आहे. सात ते आठ तास झोपेसाठी राखून ठेवायला हवेत. युवकांनीही अभ्यासाचे,कामाचे नियोजन करून योग्य झोपेच्या प्रमाणाची सवय लावून घ्यायला हवी.मुलांच्या झोपेकडेदेखील आई-वडिलांनी सतर्कतेने पाहायला हवी. त्याच्या झोपेत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यायला हवी.

# आदेश पालन सिद्धांत पद्धती संपुष्टात आल्याने कौटुंबिक कलाहात वाढ



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**एक काळ असा होता कि कुटुबांत कलह आहे अस कुटुंब शोधुन देखिल सापडत नव्हतं. आज काळ बदलला आहे त्यामुळे कलह नाही असं कुटुंब अस्तित्वात नाही. सगळीकडे कलहच कलह आहे मग नांत कोणतही असो ,आई वडील,पती,पत्नी मुलं,भाऊ,भाऊ, बहीण भाऊ, कोणाचेही विचार कोणाशी जुळायला तयार नाहीत. याचा परिणाम स्वरूप कलह वाढले मग नेमकं कसं असं काय बदल झाला कि एवढी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे.साधारणतःसिद्धांत म्हणजे काय तर एखादया विषयातील अथवा विषया संदर्भातील अलिखित नियम ज्यांचं पालन लिखित आदेशापेक्षाही काटेकोर पणे इमानेइतबारे होईल असा आदेश पालन सिद्धांत पद्धती हि जो पर्यंत भारतीय समाज व्यवस्थेत रूढ अस्तित्वात होती.**

आधुनिक केसरी

तो पर्यंत कुटुंब संस्था ही प्रचंड प्रमाणात मजबूत होती .आज प्रत्येकाला आदेश देण्याची इच्छा निर्माण झाली आहे. पण आदेश पालन करण्यासाठी कोणीही तयार नाही . आदेश पालन सिद्धांत हि पद्धत संपुष्टात आल्याने आदेश पालन करण्यासाठी कोणीही तयार असल्याचं आढळतं नाही. त्याचे विपरीत परीणाम म्हणून कुटुंब संस्था खिळखिळ होऊन मोडकळीस आली आहे.आज कुटुंब हे फक्त नावाला शिल्लक रहिल आहे. प्रत्येकाला स्वतःच स्वतंत्र अस्तित्व अपेक्षित असल्याने कुटुंबांची व्याख्या दिवसेंदिवस लहान होत चालली आहे. त्या काळी कुटुंब प्रमुख व्यक्ती हाच एकमेव प्रमुख असल्याने कुटुंबातील सर्व सदस्य हे बिनबोभाट पणे आदेशाच पालन करत. कुटुंब प्रमुख यांच्या तोंडातून जो शब्द निघाला तो कायदा असल्या सारखा असायचा. त्या शब्दांना आदेशाला कोणीही कुटुंबातील सदस्य विरोध दर्शवत नसतं . सर्वांची मुक संमती मिळत असे इच्छा आसो वा नसो आदेश



पालन करणं क्रमप्राप्त होतं . आदेश पालन सिद्धांत पद्धती चा फायदा हाच होता कि कुटुंब मजबुत सशक्त आणि अज्ञाधारक होत . कौटुंबिक कलह हा विषय अस्तित्वात नव्हताच .आई वडील मुलं आजी आजोबा चुलते मालते चुलत बहीण भाऊ असं भल मोठं दांडग कुटुंब असलं तरीही एकाच व्यक्तिचा आदेश अंतिम असायचा तो आदेश सिद्धांत समजुन लक्ष्मण रेषा म्हणून त्याचं कोणीही उल्लंघन करत नसे . म्हणुन कुटुंब हे मजबूत आणि कलहविरहीत असायचं.आज काय स्थिती आहे तर मुलं आई वडीलांच्या आज्ञेत नाहीत .कोणीच कोणाच ऐकायला तयार नाही. प्रत्येकाला आपल्या स्वतःच्या सद्सद्विवेक बुद्धी नुसार आपल् स्वतःच आयुष्य जगण्यात स्वारस्य आहे. मग सिद्धांत, शब्द, प्रमाण हे सगळं कालबाह्य झाल आहे.आई वडील,मुलं पती पत्नी प्रत्येकाला मत आहे . प्रत्येकाची भुमिका आहे.आपण स्वतः ज्ञानी आहेत हा प्रत्येकाचा समज आहे.मग आपण ज्ञानी आपल्याला समजतं तर दुसर्याच कशासाठी ऐकायचं म्हणजे आदेश वगैरे सिद्धांत पालन हि काहिच गरज नाही असं प्रत्येकाचं मत झालंय त्या मुळे आदेश पालन सिद्धांत पद्धती कालबाह्य झाली. कदाचित हि पद्धत उपयोगी नाही असं तंत्रज्ञान युगातील पिढीला वाटत असेलही म्हणून हि पद्धत बंद झाली . आदेश पालन सिद्धांत पद्धती संपुष्टात येण व कौटुंबिक कलह निर्माण होण्यास आरंभ होण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.आजही कुटुंब प्रमुखाचा आदेश पालन सिद्धांत पद्धती पुन्हा चालू झाली तर कौटुंबिक कलह संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाहीत. आजही फक्त तो मुळ विचार सिद्धांत स्वीकारायचा आहे. जो आपल्या कुटुंबाच्या समाजाच्या राष्ट्राच्या हितासाठी लाभादयी ठरेल .आपण तो मुळ विचार आणि आपल्या संसकृतीचा पाया बाजुला सोडला म्हणून हि दयनीय अवस्था आपल्याला विद्यमान स्थितीत पाह्यला मिळत आहे.आपले विचार ज्ञान हुशारी प्रचंड आहे पण ती कोणाच्या तरी अज्ञेत असल्याशिवाय लाभादायी ठरणार नाही.हेच विचार आत्मसात करुन अंमलात आणण्याची गरज आहे . जेणेकरून पुन्हा किमान सध्याचं छोटेखानी कुटुंब तरी कलह मुक्त होईल.

# माठातील पाणी पिणे फायदेशीर!

आधुनिक केसरी

**सध्या उन्हाच्या तिव्र झळाया बसत आहे.उन्हाळा असह्य झाला आहे घराच्या बाहेर पडावे की नाही असा प्रश्न पडला आहे.खासकरुन उन्हाळ्याच्या दिवसात तहान भागवण्यासाठी थंड पाण्याची आवश्यकता असते.अशा वेळी ग्रामीण भागात मातीच्या माठाची आठवण आल्याशिवाय राहत नाही. पुर्वी प्रत्येकाच्या घरी मातीची भांडी पहायला मिळायची आज ग्रामीण भागात कुंभार समाजातील अनेकांनी हस्तकला जोपासण्याचा प्रयत्न सुरु ठेवला आहे.**

आज देखिल मातीची घागर, मडके, माठ, रांजण अशी मातीची भांडी पहायला मिळतात. ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. परंतु आजच्या विज्ञान युगात जसजसी माणसाने प्रगती केली.तसतसी साधनेदेखिल बदलत गेली. जवळपास सर्वत्र तांबा, पितळ, स्टिलच्या भांड्याचा वापर वाढु लागला आहे. पिण्याचे पाणी साठविण्यासाठी विविध धातूंपासून बनवलेली हंडा, कळशी, पिंप यांचा वापर होताना दिसत आहे. मातीच्या भांड्याचा वापर कमी कमी होत चालला आहे. पाण्यासाठी आज सर्वत्र फिल्टर जार, फ्रिजचा वार वाढला आहे.त्यामुळे माठाची मागणी कमी होऊ लागली आहे.परंतू ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता माठालाच पहीली पसंत देत आहे.गरीबांचा फ्रिज म्हणून माठाला ओळखले जाते फ्रीजमधील थंड पाणी प्यायल्याने आरोग्यावर परीणाम दिसून येत आहे. पूर्वी माणसे मातीच्या भांड्यातील पाणी प्यायची आजारी पडण्याचे प्रमाण कमी असायचे. आरोग्यदेखिल चांगले रहायचे. सध्या उन्हाळ्याची तिव्रता वाढत चालली आहे.थंड पाण्यासाठी माठालाच पसंती दिली पाहिजे.जुने ते सोने याप्रमाणेच माठातील पाणी पिणे कधीही फायदेशीर आहे. तसेच उन्हाळ्यात शरीराला पाण्याची कमतरता भासते. अशावेळी थंड पाणी सतत प्यावसं वाटतं.मग प्रत्येकजण तहान भागवण्यासाठी थंड पाण्याच्या शोधात फ्रीजकडे जातो. पण फ्रीज मधील अतिगार पाणी शरीराला घटक ठरू शकते. पण आयुर्वेदानुसार माठातून पाणी पिण्याचे




अनेक फायदे सांगितले आहेत. आयुर्वेदातही मातीच्या भांड्यात पाणी पिणे, अन्न शिजवणे आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे मानले गेले आहे. माठातलं पाणी प्यायल्याने तुम्हाला टॉन्सिल्स, सर्दी यासारख्या समस्या होणार नाहीत. फ्रीजचे थंड पाणी प्यायल्याने घशात खाज सुटणे आणि खवखवण्याचा होऊ शकतो. पण मातीच्या मडक्यातील पाण्याचे तापमान घशासाठी सौम्य असते. उष्माघातापासून संरक्षण मिळविण्यासाठी माठाचे पाणी पिणे फायद्याचे ठरते. शरीरात पाण्याची कमतरता राहत नाही. फ्रीजचे थोडेसे पाणी प्यायल्यानंतरही तहान पटकन भागते. माठाच्या पाण्यामुळे शरीराला अनेक खनिजे, जीवनसत्त्वे मिळतात. उन्हाळ्यात पोट खराब झाल्यास माठातल्या पाण्यामुळे आराम मिळतो. माठाचे पाणी पोटाची उष्णता नैसर्गिक पद्धतीने थंड करते. मातीची भांडी नैसर्गिकरित्या अल्कधर्मी असतात. त्यामुळे अपचन आणि गॅस्ट्रिकशी संबंधित समस्या दूर राहतात. माठाचे पाणी प्यायल्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत मिळते. खराब कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी करून हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता माठाचे पाणी प्यायल्यामुळे कमी होते.

**संतोष दत्तू शिंदे,**
**मु.पो.काष्टी, ता. श्रीगोंदा, जिल्हा, अहमदनगर, मो.७७२१०४५८४५**

# किरण डोंगरदिवे: हळव्या मनाचा साहित्यिक शिक्षक

आधुनिक केसरी

**छडी लागे छम छम विद्या येई घम घम ही म्हण आमची पिढी लहानपणापासून ऐकत आली आहे. गुरुजी म्हटलं की कडक शिस्तीचा, छडी मारून, शिक्षा करून विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देणारा,अशीच प्रतिमा आमच्या पिढीतील आम्हाला असणाऱ्या शिक्षकांची छबी आमच्या मनात आजही कायम आहे. मात्र आनंददायी शिक्षणाने जन्म घेतला आणि छडी बाजूला पडून हसत खेळत बागडत मुलांना आनंददायी शिक्षण देण्याची संकल्पना शिक्षणक्षेत्रात आली आणि अलीकडचे शिक्षण धाक विरहित शिक्षण होऊन बसले. किरण डोंगरदिवे हा एक हाडाचा आणि आपल्या पेशाला न्याय देणारा शिक्षक.त्याला साहित्याचे अंग असल्याने आणि साहित्याच्या क्षेत्रात त्याने कमालीची उंची गाठलेली असल्याने, त्याच्या गाठीशी अर्ध्या शतकाहूनही जादा पुरस्काराची शिदोरी असल्याने आणि विशेष म्हणजे साहित्याच्या सर्वच क्षेत्रात त्याचा मुक्त संचार असल्याने त्यांच्यातील हळव्या शिक्षकाचा परिचय त्याच्या अनेक कवितांमधून होतो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

शिक्षक म्हणून आपले कर्तव्य पार पाडत असतांना त्याची शोधक नजर अनेक कवितांना जन्म देऊन जाते.ह्या कवितेतून बालमनाचा धांडोळा घेत असतांना समाजातील अनेक चांगल्या वाईट प्रसंगांना त्याची कविता न्याय देण्याचे काम करते तर अनेकवेळा समाजातील वैगुण्य,आर्थिक प्रगती करण्याच्या धुंदीत नाती विसरलेली उच्चभ्रू मुलांचं आणि शाळेत येणाऱ्या मुलांमध्ये नातवाला शोधणाऱ्या आजीचं व्यक्तिमत्व आजच्या बदललेल्या समाजाचे वास्तववादी दर्शन करून जाते. अलीकडच्या मुलांचे हरवलेले बालपण,कोत्या मानसिकतेचा त्यांच्या सभोवती असलेला वावर देखील किरण डोंगरदिवे मधील कवी अगदी सहजतेने जेव्हा सांगून जातो तेव्हा त्यातील एक एक शब्द वाचणाऱ्याला आत्मचिंतन करायला भाग पाडतो. पहा कसा दुष्काळ घेऊन फिरतात हा आसवांचा,

आजी आजोबा मेल्यावरही रडत नाहीत मुले

त्याच्या खेळत नाहीत मुले या कवितेतील ह्या ओळी माणसाला निःशब्द करून टाकतात. परदेशात बक्कळ पैशाचा पगार कमविणार्या मुलाची बोरं विकणारी आई शाळेच्या गेट बाहेर बोरं विकत असताना शाळेत बागडणार्या चिमुकल्या मुलांमध्ये आपल्या नातवाचा शोध घेत असते.



*तिच्या ममतेचा चेक कधी वठेल ते सांगा?*
*बोर दारातली वाळली नातू कधी येईल ते सांगा?*

हा प्रश्न जेव्हा किरण डोंगरदिवे आपल्या कवितेतून करत असतो त्यावेळी वाचक देखील निरुत्तर होऊन जातो. किरण चा सर्वच क्षेत्रात संचार आहे गद्य,पद्य समीक्षा, प्रवासवर्णन, तो यात नाही असे आपण म्हणूच शकत नाही. किरण डोंगरदिवे यांनी 150 नवोदित साहित्यिकांच्या साहित्यकृतीवर समीक्षा लिहलेली आहे. तो उत्कृष्ट व अभ्यासू समीक्षक आहे. नवोदितांना प्रेरणा देणारा तो प्रेरणास्रोत आहे. किरण डोंगरदिवे यांचे 5 कविता संग्रह, 3 समीक्षा ग्रंथ आणि 2 ललित साहित्य ग्रंथ आहेत. अनेक राज्यस्तरीय पुरस्काराचा धनी असलेल्या किरण डोंगरदिवे यांनी आपल्या साहित्यातून गोडवा वाटत असतांना सामाजिक विषमतेवर ताशेरे देखील ओढलेले आहे.तर मानवी स्वार्थी वृत्ती देखील त्याने त्यात टिपलेली आहे. समाजातील व्यंग टिपताना काही आदर्श देखील त्यांनी समोर ठेवलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या हळव्या मनाचा ठाव घेतांना बदलत्या काळाचे वेध घेणाऱ्या या साहित्यिक मित्राचा काल 18 एप्रिल रोजी वाढदिवस संपन्न झाला. त्याच्या निर्मितीच्या वृक्षाला येत रहाव्यात सृजनशिलतेच्या भरभक्कम फांद्या,या शुभेच्छांसह.. ***रुके तो चांद, चले तो हवाओ जैसा है* *वो दोस्त धूप में देखो तो छाव जैसा है***

# संतमंडळींचे काका; संतश्रेष्ठ गोरोबाकाका कुंभार



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**यातील आख्यायिकेच्या मागे चमत्काराचा भाग असलेला दिसून येतो. संतांच्या चरित्रात असे अनेकविध चैतन्याचे चमत्कार वर्णिलेले आहेत. चमत्काराचे चैतन्य असते. पण बऱ्याचदा समृद्ध समाजाला अशा चमत्कारातून चेतना मिळण्याऐवजी त्यांच्या ठिकाणी अंधश्रद्धा बळावताना दिसते. संतांचे जीवनदर्शन घडविताना सुद्धा केवळ चमत्कार हे त्यांचे साध्य नव्हते तर साधन होते, याचे भान राखावे. म्हणून फक्त तो त्यांच्या जीवनातील एक चमत्काराचा भाग समजावा. फार तर त्याचा सरळ सरळ अर्थ घेणे योग्य नाही. याबाबत असे म्हणता येईल की माधवबुवा धार्मिक व सहिष्णुवृत्तीचे होते.**

**(मागील अंकावरून)**

शांतपणे झोली गेले. तेव्हा संती आणि रामी संत गोरोबांच्या दोन्ही बाजूस झोपल्या. संतीने ठरल्याप्रमाणे गोरोबांचा एक हात तर रामीने दुसरा हात उचलून आपापल्या छातीवर ठेवला व दोघीही शांतपणे झोपी गेल्या. पहाटे त्यांना जाग आली, तेव्हा गोरोबा पाप, महापाप... म्हणत झटकन् उठले. अरेरे! घात झाला, आपणच आपल्या हातांनी विठ्ठलाची शपथ मोडली, असे त्यांना वाटले. संत नामदेव महाराजांनी गोरोबांच्या या स्थितीचे वर्णन असे केले- "विठोबाची माझ्या मोडियेली आण। घेऊनिया शस्त्र तोडियेले कर। आनंदला फार गोरा तेव्हा।।" संत गोरोबांनी शस्त्र घेऊन आपले दोन्ही हात मनगटापासून तोडून घेतले. गोरोबांच्या या सर्व कृतीतून आपल्या माणसाबद्दलची आत्मीयता आणि भक्ती मार्गावरील अढळ श्रद्धा किती प्रभावी होती, हे स्पष्ट होते. संतशिरोमणी गोरोबांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाचा त्याग केला, संतीने आणि रामीने त्यांचे मोठेपण मान्य केले व त्या दोघी संसार करू लागल्या, पण गोरोबांनी वैराग्यवृत्ती धारण केल्याने घरात धन-धान्याची कमतरता भासू लागली. दोघी चिंतातुर होऊन कसाबसा संसार सावरू लागल्या. मात्र शेवटी भक्ताच्या संसाराची काळजी परमेश्वरालाच असते नाही का ?कुंभारवेशात देव त्यांच्या घरी काम करू लागले. नानाप्रकारची मडकी घडू लागले. प्रेमाने भक्ताच्या घरी काम करु लागले ( भाविकांनी ही मूळ कथा ब्रह्म-वैवर्त्य पुराणात पहावी. ) गरुड माती वाही. विठ्ठल चिखल तुडवी. रुक्मिणी पाणी भरी अन् विठ्ठल चाकावर नाना प्रकारची गाडगी-मडकी तयार करु लागले. भगवंत विठ्ठल आपल्या भक्ताच्या नानाप्रकारची कलाकुसरीची मडकी तयार करु लागला आणि ती गाडगी मडकी जाळ्यामध्ये बांधून विठ्ठल आणि रुक्मिणी आसपासच्या गावी बाजारात विकू लागले. विठ्ठलाने कुंभारवेषात तयार केलेली मडकी घेण्यासाठी आसपासच्या गावातील व तेरमधील स्त्रिया येऊ लागल्या. स्त्रिया विठ्ठलरुपी कुंभाराचे कौतुक करू लागल्या. संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांनी भक्ती आणि नामस्मरण या साधनांच्याद्वारे करणी करेल तो नरका नारायण होईल म्हणजेच "विठ्ठल भक्तच विठ्ठल होऊन गेले" अशी ही पंढरीच्या पांडुरंगाची किमया त्यांनी सर्वांना पटवून दिली. संत गोरोबा संत-मंडळात वडील होतेच इतकेच नव्हे तर महाभागवतानाही आदरणीय, वंदनीय होते. संत गोरोबा विरागी पुरुष होते. अनंत, निर्गुण, निराकार अंश परब्रह्माचे लौकिक रुप म्हणजे "गोरोबा" म्हणून सर्व संत त्यांना "काका" उपाधी बहाल करतात. पंढरीच्या पांडुरंगाचे नाम महात्म्य सांगताना संत गोरोबा म्हणतात- "तूझे रुप चित्ती राहो ।मुखी तुझे नाम। देह प्रपंचाचा दास। सुखे करो काम।। देहधारी जो तो त्याचे। विहीत नित्यकर्म।। तुझ्या परी वाहिला मी। देहभाव सारा।। उडे अंतराळी आत्मा सोडुनी पसारा।। नाम तुझे गोरा। होऊनि निष्काम।।"

संत गोरोबा संसारात राहत होते. तरीही त्यांची पांडुरंग चरणी एकनिष्ठा होती- "कासयासी बहु घालिसी मळण। तुज येणेविण काय काज। एकपणे एक एकपणे एक। एकाचे अनेक विस्तारले।।" हा त्यांचा पारमार्थिक भाव होता. त्यांनी भागवत धर्माची प्रतिज्ञा भक्तीचा प्रचार व प्रसार करणे. त्यांनी स्वतःचा पारंपारिक कुंभार व्यवसाय करीत संसारही केला आणि संतपणाही सांभाळीत भागवत धर्माची प्रतिज्ञा पार पाडली. भागवत धर्माच्या या प्रतिज्ञेशिवाय पंढरीचा वारकरी मनुष्यच ठरत नाही. जो उगवला दिवस देवाला स्मरुन सार्थकी लावतो तोच वारकरी ठरतो. मग तो आपल्या घरीदारी, नियत कर्तव्यकर्मात, अरण्यात, डोंगर दऱ्याखोऱ्यात कोठेही असो. जे स्वार्थनिष्ठ, लोभी ते वारकरी संत नाहीत. संत शिरोमणी गोरोबाकाका यांची अभंग संख्या कमी असली तरी अभंगवाणीत आढळणारी उत्कटता, भावसमृद्धी यामुळे संतमेळ्यातील त्यांची अभंगरचना त्यांच्या कर्तृत्वाची ग्वाही देणारी आहे. इतकेच नव्हे तर त्यांचे अभंग त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. त्यांच्या अभंगवाणीतून साक्षात्कार, आत्मसाक्षात्कार, उत्कट भक्तीचा अनुभव, अनुभवाची संपन्नता, पवित्र आणि समृध्द असा ज्ञानानुभूतीचा प्रत्यय ही त्यांच्या अभंगवाणीतून प्रत्ययास येतो. अद्वैताचा हा अवर्णनीय आनंद आपल्या दरिद्री प्रपंचात राहूनच त्यांनी प्राप्त केला आहे. अभेदाचे बौध्दिक ज्ञान वेगळे, हे सुखाचे सुख, हे भाग्याचे सौभाग्य, हा अत्यानंदाचा आनंदकंद, गोरोबाकाका आपल्या भक्तिभाव बळावर मिळवू शकले. "मौनं सर्वार्थ साधनम्" असे ब्रीद उरी बाळगणाऱ्या शीलवान कर्मयोग्यास अवघे पन्नास वर्षाचे आयुष्यमान लाभले होते. संत गोरोबाकाकांनी अनंत काळाला आपल्या जीवनचरित्राचा आणि कार्याचा, कर्तृत्वाचा जो आदर्श निर्माण केला होता तो इतिहासाला कदापिही विसरता येणार नाही. नामाचा गजर करुन दि.२० एप्रिल १३१७- शके १२६७ साली कृष्णपक्ष त्रैयोदशीस दुपारच्या समयी तेर येथे गोरोबाकाकांनी समाधी घेतली. अशारितीने संत गोरोबाकाका यांचे व्यक्तिमत्व, जीवन चरित्र अलौकिक असेच होते. ते परग्रह्म होऊन जीवनमुक्तांचे जीवन जगले. !!

# लोकसंस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या सरोजिनी बाबर यांचे स्मरण

आधुनिक केसरी

**सरोजिनी बाबर यांचा स्मृती दिन . याचा दिवशी २००८ साली पुण्यात त्यांचे निधन झाले . त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील बागणी या गावी ७ जानेवारी १९२० रोजी झाला . त्यांचे वडील कृ भा बाबर हे शिक्षक होते . साहजिकच सरोजिनी बाबर यांना साहित्याची आवड बालपणापासूनच मिळाली होती . त्यांचे माध्यमिक शिक्षण इस्लामपूर येथे झाले होते .१९४० साली त्यांनी शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुण्याच्या एस पी कॉलेज मध्ये प्रवेश घेतला व तेथून त्यांनी १९४४ साली बी ए ही पदवी मिळविली. त्यानंतर त्यांनी एम ए व पी एच डी या पदव्या मिळविल्या.**

त्यांनी पीएचडी ला " Contribution of Women Writers in Marathi literature " हा विषय होता . काही काळ त्यांनी जिजामाता विद्यालयात शिक्षका म्हणून नोकरीही केली . स्वातंत्रसंग्रामात त्यांचे योगदान होते . त्यावेळच्या मुंबई प्रांतातील विधानसभेच्या त्या १९५२ ते १९५७ या कालावधीत सदस्य होत्या . १९६४ ते १९६६ या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभासद म्हणून सुद्धा कामगिरी केली . त्यांना राज्यसभेत सुद्धा जाण्याची संधी मिळाली . १९६८ ते १९७४ या काळात त्या राज्यसभेच्या सभासद होत्या . सरोजिनी बाबर या लोकसाहित्य समितीच्या अध्यक्षा सुद्धा होत्या . त्यांनी समाज शिक्षण माला हे मासिक चालविले होते . या मासिकाच्या माध्यमातून त्यांनी एकूण ८७ पुस्तके प्रकाशित केली . या मासिकाद्वारे एकूण ५५० पुस्तके प्रकशित झाली . या पुस्तकांचे वैशिठ्य म्हणजे टी सर्व थरात लोकप्रिय झाली . सरोजिनी बाबर यांचे वक्तुत्व सुद्धा नावाजलेले होते . गायन कलेची सुद्धा त्यांना आवड होती. आकाशवाणीवरील रान जाई ही मालिका २३ जानेवारी १९९० ला सुरु झाली. एकूण तेरा भागात ती दूरदर्शन वर दाखविली गेली. त्यांच्या बरोबर शांता शेळके या प्रसिद्ध कवयित्री होत्या. ही मालिका महाराष्ट्रा च्या घराघरात लोकप्रिय झाली. या कार्यक्रमामुळे लोकांना लोकसाहित्य म्हणजे काय ही जाणीव झाली. लोकसाहित्यातील संवर्धन व संपादना बरोबर त्यांनी अनेक कथा व कादंबर्यांची निर्मिती केली . त्यांनी अनेक दुर्मिळ व अप्रकाशित साहित्य लोसाहित्याद्वारा संकलित केले . १९६१ ते १९९३ एवढ्या दीर्घकाळ त्या महाराष्ट्र लोकसाहित्य परिषदेच्या अध्यक्षा होत्या. त्यांचे माझ्या खुणा माझी गाणी हे आत्मचरित्र सुद्धा प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे लोकसाहित्यातील अनेक दालने मराठी रसिकांना खुली केली १९५८ साली नियोजन आयोगाच्या शिक्षण विभागाच्या शिफारशीनुसार दुर्गाबाई देशमुख अध्यक्ष असलेल्या स्त्री शिक्षणासंबंधी च्या आयोगाच्या या सचिव होत्या .. अनेक साहित्यिक त्यांच्या साहित्यिक गप्पात भाग घेत. त्यामध्ये प्र के अत्रे, कवी गिरीश, ग ल ठोकळ, द वा पोतदार, श्री म माटे, यशवंत यांचा समावेश होता त्यांचे अनेक कथा संग्रह व कादंबऱ्या गाजल्या त्यामध्ये अजिता, इथे भेट संपली, हिरवा चुडा, तू भेटायला नको होतास ,स्वयंवर इत्यादींचा समावेश आहे. त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले . त्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व पुणे विद्यापीठाचा डी लिट तसेच राहुरी कृषी विद्यापीठाचा डॉक्टर ऑफ सायन्स या पुरस्काराचा समावेश आहे .भारती विद्यापीठाने त्यांना जीवन साधना या पुरस्काराने गौरविले होते . मुंबई दूरदर्शनवर प्रतिभा व प्रतिमा या मालिकेत त्यांची मुलाखत घेण्यात आली होती . त्याकाळी ती मुलाखत अतिशय गाजली होती . एकूणच सरोजिनी बाबर यांचे लोकसाहित्य, राजकारण, वक्तृत्व, संपादन, कथाकार, व कादंबरीकार या सर्वच क्षेत्रातील योगदान मोठे आहे . त्यांच्या स्मृतीस वंदन.

**शांताराम वाघ पुणे**

# वनविभागाच्या आशीर्वादानेच जतमध्ये वृक्षतोड जोमात

## वन प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**दिपक माळी**

**जत/ सांगली :** जत तालुक्यातील पुर्व भागातील हिरव्यागार वृक्षांची मोठ्या प्रमाणावर अवैध रित्या वृक्षतोड होत असूनही तालुका वन प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप वृक्षप्रेमी करीत आहे. आर्थिक अडचणीतील शेतकऱ्यांकडून कवडीमोल किमतींना विकत घेऊन शेताच्या बांधावरील झाडांची सर्रास पणे कत्तल केली जात आहे. शासनाच्या झाडे लावा झाडे जगवा या करिता शासनाकडून दरवर्षी लाखो रुपये खर्च केला जातो. या मोहिमेला हरताळ फासला जात असल्याचे चित्र सध्या जत पुर्व भागात दिसत आहे. परंतु संबंधित विभागाचे अधिकारी व लाकूड तस्करांशी हातमिळवणी करून दिवसाढवळ्या वृक्षतोड केली जात आहे. जत पुर्व भागातून आठवड्याकाठी 9 ते 10 लाकडाची ट्रके येथून दिवसाढवळ्या भरून जात असतात. याबाबत वृक्षप्रेमींकडून वनविभागास कळविले तरी आर्थिक व्यवहारामुळे अधिकारी कारवाई तर लांबच साधे भागात फिरकतही नाहीत. या परिसरातील शेत

> जत पुर्व भागात होणाऱ्या बेकायदेशीर वृक्षतोडीबाबत कायमच वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमातून आवाज उठविला जातो मात्र गेंड्याची कातडी परिधान केलेल्या व बेईमानीच्या खाल्लेल्या मीठाला जागत हे अधिकारी कोणतीच कारवाई करताना दिसत नाहीत.

शिवारात सर्वच प्रकारच्या अवैध वृक्षांची तोडणी केली जात असून ही सगळी लाकडे तालुक्यातील व मोठ्या शहरांमधील आरा मशिन, सॉ मिल व लाकूड विक्रेत्यांना पुरविले जात असल्याचे वृक्षप्रेमी बोलत आहेत. परिसरात लाकूड विक्रीचा व्यवसाय करणारे अनेक जण आहे. यातील काही व्यावसायिकांचे अधिकाऱ्यांशी घनिष्ट संबंध असल्याचे वृत्त असून शासन एकीकडे वृक्ष संवर्धन मोहीम राबवते तर दुसरीकडे अवैध वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होते. यामुळे मात्र भविष्यात लाकूड तस्करांच्या अवैध वृक्षतोडीला मोठी होणारी झाडे बळी पडणार का? असा प्रश्न उपस्थित होत असून या बाबत महसूल व वनविभाग या अनभिग्न आहे काय? असा मोठा प्रश्न असून महसूल व वनविभागाच्या संगनमताने तर ही अवैध वृक्षतोड होत नाही ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# धर्माबाद तालुक्याची संजय गांधी निराधार योजनेची कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**





**धर्माबाद :** नायगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार राजेश पवार यांनी केलेल्या शिफारशीवरून नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी नुकतेच संजय गांधी निराधार अनुदान योजना धर्माबाद तालुका समितीची कार्यकारणी घोषित केली असून अध्यक्षपदी विजय पा. डांगे यांची तर सदस्य म्हणून प्रणिता शिंदे, संजय कदम, बालाजी सावरगावे व रामचंद्र सोमठाणे यांची वर्णी लागली आहे. या योजनेअंतर्गत शासनाकडून पात्र लाभार्थी व्यक्तीस प्रतिमहिना एक हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य केले जाते. एका कुटुंबात या योजनेचे एका पेक्षा जास्त लाभार्थी असल्यास त्याला प्रति महिना बाराशे रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येते. समाजातील दुर्बल, वयवृद्ध, विधवा महिला व गोरगरीब लोकांसाठी ही

> धर्माबाद भाजप मध्ये सर्व काही आलबेल नसून आमदार व खासदार यांच्यातील गटबाजी उफाळून येत आहे. नुकतेच आमदारानी नगर परिषदेतील अशासकीय सदस्य निवड असो किंवा संजय गांधी निराधार योजना समिती असो यावरून स्पष्ट होत आहे की, जे भाजपचे आहेत पण आमदार समर्थक आहेत त्यांचीच वर्णी लागत आहे. व खासदार प्रतापराव पा. चिखलीकर समर्थक मात्र यापासून सोयीस्कर दूर ठेवले जात आहेत का? याविषयी चर्चाना उधान आले आहे.

योजना अत्यंत मोलाची मदत होते. या योजनेसाठी अनेक लोक अर्ज करत असतात मात्र त्यातील पात्र लोकांची निवड करण्यात ह्या समितीची भूमिका महत्वाची असते. आमदार राजेश पवार यांनी केलेल्या शिफारशीवरून नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी समितीच्या अध्यक्षपदी आमदारांचे विश्वासू भाजपचे माजी तालुका अध्यक्ष विजय पा. डांगे यांची तर सदस्य म्हणून प्रणिता सतीश शिंदे,जेष्ठ पत्रकार संजय कदम, बालाजी सावरगावे व रामचंद्र सोमठाणे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांच्या मित्र परिवारानी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# जिव्हेश्वर प्रतिष्ठानचा कृतज्ञता सन्मान राजकडे यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पुणे येथील श्री जिव्हेश्वर प्रतिष्ठान या संस्थेमार्फत राज्य पातळीवरील विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात शहरातील कमलेश अशोक राजकडे यांना कार्यकर्ता कृतज्ञता सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी राजकडे विद्यार्थी दशेपासून कार्यरत आहेत. आगामी काळात संस्थेचे श्री जिव्हेश्वर समाचार मासिक ऑनलाईन स्वरूपात समोर आणण्यासाठी कार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. राजकडे यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले.





# चिंचोली लिंबाजी येथे डॉ. आंबेडकर जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथे... सर्व प्रथम सकाळी चिंचोली लिंबाजी येथील ग्रामपंचायतमध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सरपंच वंदनाबाई विलास पवार यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले. संध्याकाळी मिरवणुकी दरम्यान ग्रामपंचायत मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला वंचित कार्यकर्ते श्री तातेराव भुजंग यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करण्यात आले. चिंचोली लिंबाजी येथील पोलीस पाटील यांच्या नियोजना नुसार जयंती साजरी करण्यात आली. या वेळी समस्त समाज बांधवानी परीश्रम घेऊन जयंती आनंदात साजरी करण्यात आली....या वेळी वंचित कार्यकर्ते तातेराव भुजंग यांनी समस्त गावकरी सरपंच उपसरपंच व समाज बांधवाचे आभार व्यक्त करण्यात आले.

# सात वर्षांच्या बालकाने ठेवला पहिला रोजा

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** इस्लाम धर्मात पवित्र मानल्या जाणाऱ्या रमजान महिन्यात ' रोजा'ला विशेष महत्त्व आहे. या महिन्यात लहान मुलांपासून ते वृद्धापर्यंत सर्वच पहाटे सहेरी करून रोजा ( उपवास ) ठेवतात. फुलंब्री तालुक्यातील बाबरा गावातील सात वर्षीय मुसद्दीक़ जावेद शेख ( वय 7 )या चिमुरड्याने अवघ्या वयाच्या सातव्या वर्षी जीवनातील पहिला रोजा दि.१७ सोमवार रोजी पूर्ण केला. विशेष म्हणजे या वर्षी रमजान महिना मार्च-एप्रिल महिन्यात कडक उन्हात आला आहे. या तळपत्या उन्हात या चिमुरड्याने मुलाने रोजा ठेवून एक आदर्श निर्माण केला आहे. रखरखत्या उन्हात पवित्र रमजान बद्दल असणारी प्रबल ईच्छा शक्तीच्या जोरावर दिवसभरात अन्नाचा एकही कण न खाता व पाण्याच्या घोट न पिता जवळपास दिवसाचे चौदा तास उपाशी राहून चिमुकल्या मुसद्दीक़ जावेद शेख ने पहाटे चार वाजता उठून आपल्या कुटुंबियांसोबत सहेरी केली होती. मार्च महिन्याचे कडक ऊन अशात दिवसभर अन्न पाण्या शिवाय हा रोजा त्याने ठेवला.

# क्षेत्र सावळदबारा गावाचे दोन सैनिक इंडियन नेव्ही दलात भरती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील श्री क्षेत्र सावळदबारा गावाचे दोन सैनिक नेव्ही दलात सहा महिने देश सेवेसाठी भरती झाले आहे होते त्यांचे आज दि.१६/४/२३ रोजी गावात आले असता त्यांचे स्वागत मोठ्या थाटामाटात वाजत गाजत करण्यात आले.

सावळदबारा येथील अतिशय गरीब परिस्थिती असलेले व हलाखीची परिस्थिती असलेले अमृत जमले,काशिनाथ कुरंकार व एकनाथ भोई यांचे चिरंजीव अथक परिश्रमानंतर व स्वबळावर रात्रंदिवस देश सेवेचे ब्रीदवाक्य डोक्यात ठेवून नेव्हीदलात भरती झाले सदर सैनिक आपली कर्तव्य बजवण्यासाठी देश सेवेला जात असताना श्रीक्षेत्र सावळदबारा येथील सर्व समाजातील तरुणांच्या गळ्यातील ताईत असलेले हे विद्यार्थी आज गावाचा परिसराचा व समाजाचा आदर्श ठरले आहे अशा या विद्यार्थ्यांचे सैनिकांचे गावकऱ्यांनी व शिवाजी विद्यालयाचे प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी शाल श्रीफळ देऊन पुष्पहार घालून उत्साहात स्वागत केले यावेळेस गावातील अनेक तरुणांनी हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सैनिक देवानंद कुरणकार,सैनिक चेतन जमाले व आकाश एकनाथ भोई यांचे भगवान चक्रधर मंदीरासमोर तरुण मंडळांनी मोठ्या थाटामाटात शाल श्रीफळ व पुष्पहार घालून स्वागत केले. त्यांचा आदर्श हा आपल्या डोळ्यासमोर ठेवला पाहिजेत असे प्रतिपादन प्रा जीवन कोलते पाटील यांनी केले. सदरील विद्यार्थ्यांना व पालकांना विचारले असता त्यांनी सर्वप्रथम आई-वडिलांचे आभार मानले की त्यांनी आम्हाला या देश सेवेसाठी निसंकोचपणे पाठविले व पाठिंबा दिला स्वत: अठरा विश्व दारिद्र्य भोगून पोटाला चिमटा घेऊन आमचे शिक्षण व प्रशिक्षण दिले त्यांनतर छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय



सावळदबारा येथील संस्थेचे अध्यक्ष भाऊराव कोलते व सदैव विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभी असलेले प्राचार्य पंजाबराव कोलते सर यांच्या विद्यालयात शिक्षण घेऊन आम्ही ही पात्रता पूर्ण करू शकलो त्याबद्दल त्यांनी संस्थेचे व शाळेतील सर्व शिक्षकांचे मनःपूर्वक आभार मानले की त्यांनी आम्हाला सैनिक भरती होण्यासाठी ही पात्रता पूर्ण करण्यासाठी नेहमी प्रोत्साहन व उम्मीद आमच्यामध्ये निर्माण केली. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले असे पालक अमृत जमले ,काशिनाथ कुरणकार आणि आकाश बावणे सैनिकांमध्ये भावना निर्माण झाली आहे सर्व मित्रमंडळी व गावातील प्रशिक्षण मित्र व माजी सैनिक विश्वासराव मोरे व नेव्ही सैनिक आकाश बावणे व सैनिक समाधान नरोटे अनिल नपते हे निमलष्करी दलातील तरुनाचा सैनिकांचा आदर्श आमच्या डोळ्यासमोर नेहमीच असायचा असे त्यांनी सांगितले व यानंतर देश सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत व पुढील तोपर्यंत गावातील इतर सर्व नवतरुणांना देश सेवेची भावना मनामध्ये निर्माण करून त्यांची सुद्धा भरतीसाठी प्रोत्साहन देऊ असे त्यांनी सांगितले यावेळेस गावातील सर्व नवतरुण मित्र मंडळ व सर्व समाजातील बांधवांनी या तरुणांचे जल्लोषात स्वागत केले यावेळेस गावातील सर्व पत्रकार बंधू व प्रतिष्ठित नागरिक व नवतरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुसमोड सरपंचपदी धायगुडे तर उपसरपंचपदी स्वाती मदने बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज




**माळशिरस :** तालुक्यातील कुसमोड ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंच निवडीसाठी आज निवडणूक निर्णय अधिकारी रणसुंभ यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्रामपंचायत सदस्यांची आज कुसमोड ग्रामपंचायत कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सरपंच पदासाठी महावीर उर्फ पुरुषोत्तम पांडुरंग धायगुडे व तुषार माधव लवटे यांचे अर्ज आले होते तर उपसरपंच पदासाठी स्वाती नाथा मदने यांचा एकमेव अर्ज आला होता. सरपंच पदासाठी तुषार लवटे यांनी भरलेला अर्ज माघारी घेतल्याने सरपंच पदी महावीर धायगुडे यांची तर उपसरपंचपदी स्वाती मदने यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी रणसुंभ यांनी जाहीर केले .या निवडीवेळी माजी सरपंच तुषार लवटे, माजी उपसरपंच राणी पवार, ग्रामपंचायत सदस्य शहाजी लेंगरे, बाळकृष्ण धायगुडे, रेखा पालखे, शारदा धायगुडे हजर होते तर उमा कचरे गैरहजर राहील्या. निवडीनंतर नुतन सरपंच व उपसरपंच यांचा माजी सरपंच व उपसरपंच यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदर निवडीवेळी मनोहर लवटे, डॉ सुरेश सातपुते, तानाजी शेंडगे,भिवा शिंदे,लक्ष्मण पवार, माजी उपसरपंच संजय पाटील, गोपाळ माळी,शहाजी लेंगरे, उत्तम मोरे, अनंता धायगुडे, अशोक लेंगरे, नाथा मदने, शशिकांत घडयाळे, गणेश लेंगरे,सोमनाथ वाघमारे, अशोक राजगे, नितीन मोरे, सुभाष जाधव, देवा धायगुडे, कैलास धायगुडे, सिद्धेश्वर पाटील, विजय धायगुडे गुरुजी, किशोर लवटे, श्याम धायगुडे, उमाजी बोडरे, देवानंद चव्हाण, अशोक चव्हाण, बापु धायगुडे, शिवाजी धायगुडे, यांच्यसह अनेक मान्यवर ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर नुतन सदस्यांनचा सत्कार करण्यात आला तसेच फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची उधळण करण्यात आली. सर्व निवडणुक प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी रणसुंभ, सहहयाक ग्रामसेवक कोरबु,याच्या अध्यक्षतेखाली शांततेत पार पडली.

दरम्यान यावेळी माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी याठिकाणी भेट देऊन पाहणी केली. तर त्यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सतीश धुमाळ व इतर सहकाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# अरहमखान यांचा पहिला रोजा पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** मुस्लिम समाजातील सर्वात पवित्र रमजान हा महिना असून येथील



सुभेदारनगर मधील रहिवाशी अरहमखान आमेरखान वय आठ वर्ष या मुलाने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला आहे सध्या या वर्षाचा उन्हाळा अत्यंत उष्णतेचा सर्वात जास्त तापमान असलेला महिना हा रमजान महिना आला आणि मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या महिन्यात संपूर्ण महिनाभर पाणी न पिता उपवास रोजा ठेवला जातो या उष्णतेचे मोठे व्यक्तींना खूप त्रास होतो त्यात आठ वर्षाचे चिमुकल्याने पहिला रोजा ठेवून आपल्या इस्लाम धर्माच्या परंपरेनुसार आयुष्याची सुरुवात केली अल्लाह समोर पुण्याई चांगल्या प्रकारे व्हावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना अशा उष्णतेचे तापमानामध्ये आठ वर्षे चिमुकल्याने अरहमखान आपल्या आयुष्याचा पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल वडील आमेरखान काका समीरखान आजोबा मोहम्मद सिद्दीक, अजी नसरीनबानो, मामा मोहम्मद इद्रीस, मोहम्मद इलियास, मोहम्मद अयाज आधी मित्र व परिवारांनी शुभेच्छा दिल्या.

# अश्कान पठान, अरकान पठान यांचा पहिला रोजा



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील पिशोर येथील अश्कान, आणि अरकान ने आपल्या जीवनातला सवर्प्रथम रोजाची सुरवात केली आहे, तसेच रामजान महीना हा मुस्लिम समाजात महत्वपूर्ण मानला जातो अनेक मुस्लिम वर्ग महिन्याचे पूर्ण रोजे ठेऊन 5 वेळीची नमाज अदा करता त्या सोबत तराबिचि मोठी नमाज़ ही महिन्याभर अदा करतात, कुरानची तिला वत करून, दान धर्म करण्यास या महिन्यात जास्त प्राधान्य देतात, तसेच पहाटे 4 वाजेपासुन सहेरी करून सायंकाळी 7 वाजेच्या दरम्यान रोजा सोडला जातो अशी माहिति पिशोर येथील जेष्ठ पत्रकार सय्यद आरेफ़ यांनी दिली, अश्कान पठान याची वय 8 वर्ष आहे तर अरकान 7 वर्षाचा आहे, हे दोघे प्रमुख रहिवासी चिखलठान येथील रहिवासी आहे मात्र त्यांचा रोजा खोलिचा कार्यक्रम पिशोर येथील त्यांच्या आत्या च्या घरी घेण्यात आला, रोजा खोलीच्या कार्यक्रमा निर्मित परिसरातील नागरिकांनसाठी इफ्तार पार्टी तसेच जेवनाचा कार्यक्रम ही ठेवण्यात आला होता लहान वयात पूर्ण दिवस भराचा उपवास ठेवल्यांने चिमुकल्यांचा सर्वत्र कौतुक केला जात होता कारण मागील काहि दिवसा पासून अवकाळी पाउस हजेरी लावत असल्याने वातावरनात मोठा बदल होत आहे दिवसभर ढगाळ वातावरण असल्यामुळे गर्मी चा प्रमाण वाढला आहे मात्र तरी सुद्धा दिवस भराचा रोजा या दोन्ही भावांनी पकडला, या वेळी जामा मस्जिद चे अमीर साहब शेख नासेर मिया, पंच कमिटी चे अध्यक्ष लतीफ शेख, मौलाना शेख सजिद,मौलाना परवेज़, अफसर शेख, असद शेख,रईस टेलर,पत्रकार सय्यद आरेफ़,नासेर शेख,कैसर शेख, अमजत शेख,यूसुफ (शहिंशा), माजी वनपाल नजीर शेख,उस्मान शाह, मसीउद्दीन शेख, लालूभाई शाह,डॉक्टर वसीम शेख, शाहरुख मंसूरी, आदिल शेख,अरशद राशिद, अशपाक शेख, आतिक शेख ,साद शेख,सय्यद सोहेल,सय्यद शोहेब,इलियास पठान,अशरफ पठान,यांच्या सोबत ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संखेने उपस्थित होते.




# भाग्यश्री पगडे अकोला येथे पोलीसपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भाग्यश्री विनायक पगडे रा सांजुळ ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर हि ची अकोला पोलीस पदी निवड झाल्याबद्दल भाग्यश्री पगडे व तिचे आई वडील यांचा सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी सौ अनुराधाताई चव्हाण जिल्हा परिषद सभापती तसेच माजी सभापती पंचायत समिती विवेक चव्हाण भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष बाळासाहेब तांदळे माजी सरपंच सांडू जाधव माजी तालुकाध्यक्ष नरेंद्र देशमुख माजी तालुकाध्यक्ष बाळासाहेब सोटम माजी उपसभापती एकनाथ धटीग माजी पंचायत समिती सदस्य कैलास सोनवणे सांजुळचे सरपंच सौ रुखमबाई गायकवाड उपसरपंच योगेश जाधव गावचे पोलीस पाटील नामदेव साळुके मोरे मॅडम, कॉन्फिडन्स करिअर अकॅडमी (फुलंब्री) चे संचालक श्री. गणेश डिवरे सर व श्री. विष्णू मुळे सर व श्री. नंदू सोटम , मनोज चिकटे,विनोद कसारे, श्री. भास्कर राऊत , श्री पप्पाजी जाधव ,आनंद पगडे समस्त पंचक्रोशीतील सत्कार प्रसंगी उपस्थित होते.





# हे भगवान, सद् रक्षणाय, खल निग्रहणाय नावाला गालबोट !

## सहाय्यक पोलीस निरीक्षक नाईकवाडेकडून लाचेमध्ये पाच लाख किंवा जुन्या गाडीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील परंडा पोलीस स्टेशन मधील, सहाय्यक पोलीस निरीक्षक भगवान नाईकवाडे यांच्यावर 90 हजार रुपयाची लाच मागितल्या बद्दल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई करण्यात आली .याबाबत सविस्तर वृत्त असे की, भगवान भरत नाईकवाडे, दहशतवादी विरोधी पथक, उस्मानाबाद येथे सन 2019 मध्ये नेमणूकीस असताना त्यांनी वाशी येथील पत्त्याच्या क्लब वर धाड टाकून त्यामध्ये त्यांनी वाशी येथील तक्रारदार व इतर लोकांविरुद्ध कलम 353, 307 चा गुन्हा दाखल केला. परंतु गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांचा सहभाग नसल्याने त्यांना आरोपी केले नव्हते. या साठीच सहाय्यक पोलीस निरीक्षक भगवान नाईकवाडे याने गुन्ह्यात नाव न घातल्याच्या कारणाखाली पोलीस शिपाई सागर वसंतराव कांबळे याच्यामार्फत तक्रारदार यांना सन 2019 मध्ये जुगाराच्या गुन्ह्यात आपणास मदत केली व आपल्यावर 353 व 307कलम खाली आरोपी केले नाही म्हणून 5लाख किंवा सेकंड हॅन्ड गाडी द्यावी अश्या स्वरूपाच्या लाचेची मागणी केली शेवटी 90हजारवर तडजोड केल्या प्रकरणाची तक्रार तक्रारदाराने 14 एप्रिल रोजी धाराशिव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयाकडे तक्रार दिली. परंतु सदर आरोपींनी लाचेची रक्कम स्वीकारताना संशय आल्याने, तक्रादार यांचेकडून लाच रक्कम स्वीकारली नाही. सदर आरोपी भरत नाईकवाडे व सागर कांबळे दोघांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन परांडा, ज़िल्हा धाराशिव येथे गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई सापळा पथक - पोलीस निरीक्षक विकास राठोड, पोलीस अमलदार दिनकर उगलमोगले, मधुकर जाधव, अर्जुन मारकड,सचिन शेवाळे, विष्णू बेळे, सिद्धेश्वर तावसकर, विशाल डोके यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उप अधीक्षक, सिद्धाराम म्हेत्रे,यांच्या मार्गदर्शनाखाली केली.



## श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त मंदिरात लोटला सेवेकरींचा जनसमूदाय

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापुर :** श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात बारा एप्रिल पासुन गुरु चरित्र पारायण,श्रीमद भागवत पारायण, श्री दुर्गा सप्त्मी सती,श्रीपाद श्री वल्लभ पारायण घेण्यात येउन मंगळवार(ता१८)रोजी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित सकाळी साडे दहा वाजता स्वामींची महा आरती घेण्यात आली. सर्व सेवेकरीनी सेवा केली. या प्रसंगी माजी नगरसेवक लिमेश वाणी, विद्यमान नगरसेवक तथा शिवसेना तालुका प्रमुख सचिन वाणी, नगरसेवक दशरथ बनकर,माधुरी बनकर, धोंडीरामसिंह राजपूत,अरविंद तुपे, सुरेश आलुले, दत्ता रोजेक, सचिन राजपूत, सी.के.पवार, विनोद साळवे, श्रेयस चव्हाण, बापू गावडे, गंगारामसिंह राजपूत,रन्विर राजपूत, तुषार अनर्थे,कारभारी महापुरे, दादा मापारी, अविनाश खांबेकर, भाऊसाहेब पगार, हरिदास, शिंदे सर,बाळू कोत्कर ,नंदू लाडवाणी,शिवा भुजबळ, श्रीमती आलुले, कू. पूरी आदी उपस्थित होते.

## सावळदबारा येथे ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे ग्रामपंचायत कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ जयंती निमित्त बहूजनाचे कैवारी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन सरपंच शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो.आरिफ मो. लुखमान व पत्रकार जब्बार डी तडवी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यासंगी ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल थोडक्यात माहिती दिली.यावेळी माजी सरपंच ईश्वर कोळपे, प्रा. योगेश चोपडे, ग्रामसेवक सुधीर भालेराव, ग्रा.सदस्य मोहन सुरडकर, शंकर काळे,ईशा तडवी, फकीराभाऊ तडवी, ग्रामपंचायत कर्मचारी आणिल राजपूत,संजय नप्ते, अमोल राऊळकर, सुभाष मानकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत नारायणराव भालेराव यांचा जन्म हिंगोली जिल्ह्यातील रिधोरा या गावी १९६२ साली झाला. ग्रामीण कवी म्हणून मराठी साहित्यात प्रसिद्ध असलेल्या इंद्रजीत भालेराव यांनी परभणी येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात ३४ वर्ष मराठीचे अध्यापक म्हणून सेवा केली. १९९१साली पैठण येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान ही भालेराव यांना मिळाला होता. विपुल साहित्य संपदा लिहिणाऱ्या भालेराव यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यांनी शेतकऱ्यांचे वर्णन प्रामुख्याने आपल्या कवितांमधून केले.त्यांच्या "दूर राहिला गाव " व "भुईचे मार्दव"या काव्यसंग्रहातील काही कवितांमध्ये त्यांनी माहेरचे खूप सुंदर असे वर्णन केलेले आहे.**

सासरी गेलेल्या लेकीच्या भेटीसाठी आतुर झालेल्या आईच्या मनातील भावना कवीने पुढील ओळीत व्यक्त केलेले आहेत.

***उभ्या उभ्या आडरातर,येऊन जाय गं लेकी***
***तिथं आता सुरू असेल उन्हाचा कहर***
***इथं आता पिकली आंबेराई फार***
***चार दिवस सावलीमध्ये राहून जाय गं लेकी***

प्रत्येक आईच्या मनाला आपल्या लेकीची काळजी लागलेली असते. काही नव- जुनं खाण्यासाठी केलं की तिला लेकीची आठवण येते. तसंच माहेरात पिकलेली आंबेराई पाहून आईला वाटतं, चार दिवस माहेरी येऊन लेकीने आंबे खाऊन जावे. जर सासरी परिस्थिती बेताची असेल. व सासरची माणसंही तिला समजून घेणारी नसतील तेंव्हा मात्र आईला लेकीची फारच काळजी वाटते. त्या काळजीने आईचे मन काय म्हणते? हे कवी पुढील ओळीतून व्यक्त करतात.

***विहिणीच्या टोमण्यानं कान किटला असंल***
***रोज -रोज चटणी भाकर  जीव इटला असंल***
***तुपासंग पुरणपोळी जेवून जाय गं लेकी***

लेकीच्या मनातील चार गोष्टी आईला ऐकायच्या असतात व आपल्या मनातलं ही तिला सांगायचं असतं. या भावना व्यक्त करताना कवी म्हणतात,

***संगमंग गुज बोलू रात जागून काढू***
***आनंदाने हसू दोघी आनंदाने रडू***
***सकुनाचा हिरवा चुडा लेवून जाय गं लेकी***

सासरी गेलेली लेक सुद्धा आईवर थोडीशी रागावलेली आहे. माहेरातील आर्थिक परिस्थिती व सासरची आर्थिक परिस्थिती या प्रचंड तफावत आहे. सासरी कोणी समजून घेणार नाही त्यामुळे काहीशी दुःखी असलेली
लेक आईला म्हणते, ***जाय तुला बोलायची नाय***
***माय, जाय तुला बोलायची नाय***
***लाडाची लाडाची लेक तुझी मी***
***गोरी भुरी होते नव्हती खुजी मी***
***जावयात पाहिलंस काय?***

लेक म्हणते मी आता तुला बोलणार नाही. मला एवढे लाडाकोडात वाढवलं. मी गोरी आणि दिसायलाही छान होते. मी काही बुटकी- काळी नव्हते. पण तू काय पाहून माझे लग्न करून दिले? असा कसा जावई शोधला? पुढे लेक म्हणते,

***दूध -तूप देऊन लखवलं मला***
***दुपारी दही तू चाखवलं मला***
***सासूची खाल्ली हाय***

सासरी नवरा, सासू, सासरे, यांपैकी कोणीच तिला समजून घेणार नाही. व माहेरी दूध, तूप, दही, हे खाण्याची आईने सवय लावली होती. यातलं काहीच सासरी मिळत नाही. शेवटी लेक आईला म्हणते,

***माहेरी होता विहीर मळा***
***पाटाच्या पाण्याचा पायाला लळा***
***इथे सासरी पोळतात पाय***
***पाहून दिलास डोंगरी गाव***
***सकुनी कावळा करिना काव***
***दुधावर येईना साय***

लेकीला माहेरी सारं काही मुबलक प्रमाणात मिळायचं. त्या तुलनेत सासरी यातलं काहीच तिला मिळत नव्हतं. त्यामुळे लेकीचा आईवर असलेला राग लेकीने व्यक्त केलेला आहे. प्रत्येक सासुरवाशीनिला सासरी असताना घरातील सारी कामे करावे लागतात. व तिने कितीही काम केले तरी घरचे त्याला काहीतरी नावे ठेवतातच. यावर कवी म्हणतात,

आतड्याची कात आतून सोलिते
जगात माहेर जन्माला घालिते
नाळ वाळताच लागते छळाया

पुढे एका कवितेत कवी म्हणतात,

***माहेराचा झोका ।जातो सासराला***
***गाय वासराला। बोलविते***
***पंचमीचा सण ।येतो श्रावणात***
***लेकीच्या मनात ।हिरवळ***



पंचमीच्या सणाला झोका बांधला जातो. व नवविवाहिता मुलींना या सणाला माहेरी नेले जाते.जसे वासरू गाईची आतुरतेने वाट पाहते. तसेच लेक माहेरी जाण्यासाठी वाट बघते. पूर्वीच्या काळी लेकीला नेण्यासाठी भावाला घोडे घेऊन पाठवले जायचे. याविषयीचे वर्णन करताना कवी म्हणतात,

***अशावेळी येते ।मुरळ्याचे घोडे***
***भाऊ चाले पुढे ।पायी पायी***
***भावा- बहिणीचा ।मायेचा संवाद***
***ऐकत असे पांद। आवडीने***
***माहेराला येते । सासुरवाशीन***
***होते सुखाशीन। चार दिस.***

माहेरी आलेली लेक जेंव्हा सासरी जाते तेंव्हा आईच्या मनातील भावना व्यक्त करताना कवी म्हणतात,

***गेली माझी मईना***
***झाला एक महिना***
***मला झोप येईना***
***कुणी सांगा पाहिली का?***

माहेरात जोपर्यंत आई -वडील असतात. तोपर्यंतच माहेरपण असतं. त्यांच्या मागे मात्र माहेर तुटते. तिथे गेल्यावर तो जिव्हाळा, ती माया मिळत नाही. यामुळे त्या स्त्रीचे मन म्हणतं,

***माझं तुटलं माहेर, माय माहेराला गेली***
***जोत चढायला गेलो, ठेच पायरी लागली***
***माझं तुटलं माहेर, माझा उदासला बाप***
***झाला बैरागी दिवाना, पाहूनही कापा काप***
***माझं तुटलं माहेर, सख्खे भाऊ पक्के वैरी***
***थाटल्यात आंबराया, माझी नाही एक कैरी***

आई-वडिलांच्या नंतर माहेरातील कोणत्याही गोष्टीवर लेकीचा तेवढा अधिकार राहत नाही. तिला परक्यासारखे वाटते. माहेरात थाटलेली आंबराई असूनही एका कैरीवरही लेकीचा अधिकार नाही. अशा भावना वरील ओळीतून व्यक्त केलेल्या आहेत. लेकीच्या सासरी काही कार्यक्रम असेल व त्यानिमित्ताने तिला आहेर घ्यायचा असेल. तर तोही आई-वडिलांच्या पश्चात मिळेलच असे नाही त्याच्यासाठीही तिला वंचित राहावं लागतं. पुढे एका कवितेत कवीने असे म्हटले आहे की,

जुन्या -नव्या सगळ्याच सासुरवाशींच्यासाठी
इथं तिथं सगळीकडंच
सारखंच व्हावं सासर- माहेर

अशाप्रकारे कवी इंद्रजीत भालेराव यांनी आपल्या काही कवितांमधून स्त्री मनाच्या हळवा कोपरा असलेल्या माहेराचे व मायलेकीच्या सुंदर नात्याचे वर्णन केलेले आहे. या कवितांमधून कविने स्त्री मनाचा ठाव घेतला आहे.

